गुरुवार, 10 नोव्हेंबर 2022
किंमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - 02 अंक -91
आरएनआय : MAH/2021/82566

आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● THURSDAY 10 NOVEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-91 ● RNI : MAH/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

# ईडीला झापले

## न्यायालय अशा वर्तणुकीला पाठबळ देणार नाही : संजय राऊत यांना जामीन



आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : शिवसेनेची मुलुखमैदानी तोफ, ठाकरेंचा आवाज तथा सेनेचे फायरब्रँड नेते संजय राऊत यांना अखेर बुधवारी १०० दिवसानंतर पीएमएलए कोर्टाने जामीन मंजूर केला. पण या जामीनाविरोधात ईडीने पुन्हा हायकोर्टात अपील केले. मात्र यावेळी मुंबई हायकोर्टाने ईडीला चांगलेच झापले. संजय राऊतांची अटक बेकायदेशीर आहे. संजय राऊतांना कोणतेही कारण नसताना अटक केली. त्यांना १०० दिवस जेलमध्ये ठेवले. याप्रकरणी पीएमएल कोर्टात अनेक सुनावणी पार पडल्या.**

दोन्ही बाजूंच्या अनेक युक्तिवादानंतर पीएमएलए कोर्टाने राऊतांना जामीन मंजूर केला. त्यामुळे तुमच्या लगोलग अपील करण्याने आम्ही काही क्षणांत राऊतांचा जामीन फेटाळणार नाही, दोन्ही आरोपींची अटक कायदेशीर होती हे पटवून द्या, असे सांगतानाच मुंबई हायकोर्टाने ईडीला जोरदार चपराक लगावली. मुंबई उच्च न्यायालयाने ईडीची मागणी स्वीकारण्यास नकार देतानाच जामीनाला स्थगिती देण्यास नकार दर्शवला. पीएमएलए कोर्टाची निरीक्षणे कशा प्रकारे अयोग्य आहेत हे पटवून द्या, त्यानंतर आम्हाला जर तुमचा युक्तिवाद पटला तर आम्ही आरोपीला ताब्यात घेण्याचा आदेश देऊ शकतो. पण तूर्तास त्यांच्या जामिनाला कोणत्याही प्रकारे फेटाळू शकत नाही, असे स्पष्ट शब्दात सांगत मुंबई हायकोर्टाने ईडीला झापले. 'ईडीकडून निवडून, वेचून कारवाई केली जात असल्याचे दिसत आहे. ईडीच्या कारवाईत असमानता दिसत आहे. न्यायालय अशा वर्तणुकीला पाठबळ देऊ शकत नाही. न्यायालयाने ईडीचा युक्तिवाद आणि म्हाडाचे म्हणणे मान्य करत दोन्ही आरोपींचे जामीन अर्ज फेटाळले तर ईडीच्या अशा वर्तणुकीला पाठबळ दिल्यासारखे होईल. परिणामी सर्वसामान्य व निष्पाप लोकांकडून न्यायालयावर जो विश्वास दाखवला जातो, त्यालाच धक्का बसेल', असे निरीक्षणही न्या. देशपांडे यांनी नोंदवले. 'ईडीने नोंदवलेल्या अनेक साक्षीदारांच्या जबाबांमधून एचडीआयएलचे राकेश व सारंग वाधवान यांची या प्रकरणातील मुख्य भूमिका स्पष्ट होते. मात्र, त्यांना ईडीने अटक केली नाही. कथित मूळ गुन्ह्याशी संबंधित गुन्हेगारी कृत्यातील आर्थिक कमाईशी किंवा मनी लाँड्रिंग, गुन्हेगारी कृत्यांशी प्रवीण राऊत व संजय राऊत यांचा संबंध नसताना आणि त्यांचे आर्थिक व्यवहार त्यांच्या पैशांतील असताना त्यांना अटक करण्यात आली. ईडीच्या अशा वर्तणुकीतून दोघांना अमर्यादित काळापर्यंत गजाआड ठेवले जाऊ शकत नाही', असे कोर्ट म्हणाले.

**न्यायाधीश काय म्हणाले :** पत्राचाळ घोटाळ्याच्या प्रकरणात म्हाडाच्या भूमिकेबद्दलही संशय व्यक्त करून ईडीने म्हाडाच्या कोणत्याच कर्मचाऱ्याला आरोपी केले नाही . शिवाय कथित घोटाळ्यातील मुख्य आरोपी राकेश व सारंग वाधवान यांना ईडीने अटकच केली नाही . त्यांना मोकाट सोडले . त्याच प्रकरणात स्पष्टपणे दिवाणी वादाचे स्वरुप असूनही त्या प्रकरणाला मनी लाँड्रिंग प्रकरणाचा शिक्का लावून ईडीने प्रवीण राऊत यांना अटक केली आणि संजय राऊत यांना तर कोणत्याही कारणाविना अटक केल्याचे दिसते, अशी अतिशय गंभीर निरीक्षणे न्यायाधीश एम . जी . देशपांडे यांनी आदेशात नोंदवली .

## राहुलजींच्या स्वागतासाठी



भारत जोडो यात्रेला महाराष्ट्रात अभूतपूर्व प्रतिसाद मिळत आहे. बुधवारी राहुल गांधींच्या स्वागतासाठी सकाळी सहा वाजता शंकरनगर ते नायगाव रस्त्यावर दोन्ही बाजूला, गावांच्या वेशीला, नाक्यांवर, चौका-चौकांत कुटुंबेच्या कुटुंबे, शाळकरी मुले, तरुण आणि वयोवृद्ध लोकही उभे होते. पदयात्रेत 'जातपात का बंधन तोडो, भारत जोडो, भारत जोडो', घोषणांचा जयघोष सुरू होता.

# दहशतवाद, अंतर्गत सुरक्षेवर बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या अध्यक्षतेखाली आज दिल्लीत देशभरातील इंटेलिजन्स ब्युरो अधिकाऱ्यांची एक दिवसीय उच्चस्तरीय बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत देशाची अंतर्गत सुरक्षा परिस्थिती, दहशतवादाचा धोका यासह केंद्र आणि राज्य यंत्रणांमध्ये समन्वयाची गरज, यावर चर्चा झाली. गृहमंत्रालयाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने नाव न सांगण्याच्या अटीवर एएनआय वृत्तसंस्थेला सांगितले की, गृहमंत्री अमित शाह देशातील मजबूत अंतर्गत सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी या बैठकीत दहशतवाद, अंतर्गत सुरक्षा, गुप्तचर माहिती गोळा करणाऱ्या नेटवर्कसह इतर महत्वाच्या गोष्टींचा आढावा घेतील. याबाबतच माहिती देताना सूत्रांनी सांगितले की, या बैठकीला देशभरातील गुप्तचर मुद्द्यांशी संबंधित अनेक वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. त्यांच्याशिवाय केंद्रीय गृहसचिव अजय कुमार भल्ला आणि आयबी प्रमुख तपन डेका यांनीही बैठकीला हजेरी लावली. तत्पूर्वी, मागील महिन्यात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या अध्यक्षतेखाली हरियाणातील सूरजकुंड येथे देशभरातील गृहमंत्र्यांसह दोन दिवसीय चिंतन शिवार आयोजित करण्यात आले होते. गृहमंत्र्यांच्या चिंतन शिबिरात केंद्र आणि राज्य सरकारमध्ये अनेक मुद्यांवर सहमती झाली. यामध्ये बिहार आणि झारखंड नक्षलमुक्त करणे, अंतर्गत सुरक्षेवर एकत्र काम करणे, फॉरेन्सिक तपास, सायबर गुन्ह्यांमध्ये गुंतलेल्या गुन्हेगारांना पकडणे, दहशतवाद, अंमली पदार्थांचे व्यवहार आणि इतर गुन्ह्यांचा समावेश आहे. चिंतन शिबिरात सांगण्यात आले की, 2047 च्या आराखड्यांतर्गत केंद्र व राज्यांनी एकत्र काम करावे. ईशान्येत गेल्या 8 वर्षात 9200 सशस्त्र नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केल्याचेही चिंतन शिवारात सांगण्यात आले. दरम्यान, केंद्रीय गृह मंत्रालयाने सोमवारी (7 नोव्हेंबर) आपला वार्षिक अहवाल प्रसिद्ध केला. यात दावा करण्यात आला आहे की, 2021 देशाची अंतर्गत सुरक्षा परिस्थिती नियंत्रणात राहिली. देशातील अंतर्गत सुरक्षा व्यवस्था मजबूत ठेवणे ही केंद्र सरकारची पहिली प्राथमिकता आहे.

# फरार नीरव मोदीला भारतात आणण्याचा मार्ग मोकळा

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** पंजाब नॅशनल बँक घोटाळा प्रकरणी भारतातून फरार झालेला हिरे व्यापारी नीरव मोदीला पुन्हा भारतात आणण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. लंडनमधील उच्च न्यायालयाने बुधवारी यासंदर्भात एक महत्त्वपूर्ण निकाल दिला असून त्यानुसार तब्बल १३ हजार ५०० कोटींचा घोटाळा करणाऱ्या नीरव मोदीची भारतीय तपास यंत्रणांकडून आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी तास होणार आहे. पीटीआयनं यासंदर्भातलं वृत्त दिलं आहे. नीरव मोदीला भारताच्या ताब्यात देण्यात यावं, यासाठी लंडन कोर्टात भारताकडून सातत्याने बाजू मांडली जात होती. याविरोधात नीरव मोदीनं लंडन उच्च न्यायालयात याचिकाही दाखल केली होती. मात्र, आज या याचिकेच्या सुनावणीदरम्यान लंडन कोर्टानं ही याचिका फेटाळून लावली आहे. त्यामुळे नीरव मोदीच्या मुसक्या आवळून त्याला भारतात आणण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. खरंतर फेब्रुवारी महिन्यातच नीरव मोदीला भारताच्या ताब्यात देण्यासंदर्भात वेस्टमिन्स्टर मॅजिस्ट्रेट कोर्टानं निर्णय दिला होता.


# सर्वोच्च न्यायालयात पुन्हा मराठी ठसा

## न्यायमूर्ती डी. वाय. चंद्रचूड देशाचे ५०वे सरन्यायाधीश

आधुनिक केसरी न्यूज

नवी दिल्लीः न्यायमूर्ती डी.वाय चंद्रचूड यांनी बुधवारी देशाचे ५० वे सरन्यायाधीश म्हणून शपथ घेतली आहे. डी. वाय. चंद्रचूड हे पुढील दोन वर्ष सरन्यायाधीश म्हणून सर्वोच्च न्यायालयाचे कामकाज पाहणार आहेत. गुरुवार, १० नोव्हेंबर २०२४ रोजी सरन्यायाधीश उदय लळीत या पदावरून निवृत्त होतील. त्यामुळे निवृत्त होणारे सरन्यायाधीश नव्या सरन्यायाधीशांच्या नावाची शिफारस करतात. त्यानुसार लळीत यांनी न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांच्या नावाची शिफारस केंद्राकडे केली होती. न्यायमूर्ती डी. वाय. चंद्रचूड यांनी देशाचे ५० वे सरन्यायाधीश म्हणून शपथ घेतली आहे. बुधवारी राष्ट्रपतीभवनात हा शपथविधी सोहळा पार पडला. सरन्यायाधीश लळीत यांच्यानंतर धनंजय चंद्रचूड हे सर्वात वरिष्ठ न्यायमूर्ती आहेत. लळीत यांच्यानंतर देशाला पुन्हा एकदा मराठमोळे सरन्यायाधीश लाभले आहेत. चंद्रचूड यांचे वडील न्यायमूर्ती यशवंत चंद्रचूडदेखील सरन्यायाधीशपदी तब्बल ७ वर्ष ४ महिने अशा प्रदीर्घ काळासाठी कार्यरत होते. धनंजय चंद्रचूड यांनी मुंबई उच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून काम केलं. त्यानंतर त्यांनी अलाहाबाद न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून काम केलं आहे. दरम्यान, न्या. धनंजय चंद्रचूड यांना ही मोठी संधी मिळाली आहे. त्यांच्या आई प्रभा या शास्त्रीय संगीतकार होत्या. वडील न्या. यशवंत विष्णू चंद्रचूड यांनी सरन्यायाधीशपद भूषवले. वडिलांचा वारसा चालवत न्या. धनंजय यांनी आतापर्यंत उल्लेखनीय कामगिरी केली. महत्त्वाच्या व सार्वजनिक हिताच्या न्यायनिवाड्यांद्वारे न्यायदान करण्याबरोबरच कायद्याच्या विद्यार्थ्यांना अध्यापन, महाराष्ट्रातील न्यायाधीशांना प्रशिक्षण, विधी व न्यायाशी संबंधित लेखन आणि विद्यापीठांमध्ये व्याख्याने असे विविधांगी काम त्यांनी केले आहे.

कितीही ज्ञान असले तरी बोलता आले पाहिजे
जालना शहरात
भाषणकलेची कार्यशाळा
दर रविवारी २ तास, प्रत्यक्ष सरावातून प्रशिक्षण
✻ व्हाट्सप संपर्क ✻
विनोद जैतमहाल
9823028332
SPEAKER'S ACADEMY
भाषणकलेची कार्यशाळा
Changing lives since 2016




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


# सेवाव्रती



आधुनिक केसरी

म. गांधींनी लोकांना ' खेड्याकडे चला ' असे आवाहन केले. खेडी स्वयंपूर्ण होण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. पण आमच्याकडील उच्च शिक्षित तरुणांना शहराकडून खेड्यात जाणे हे मागासलेपणाचे लक्षण वाटू लागले. त्यामुळे या दोघांनीही घेतलेला निर्णय खऱ्या अर्थाने क्रांतिकारक होता. संत तुकारामांच्या उक्तीप्रमाणे ' सत्य असत्याशी मन केले ग्वाही, मानियले नाही बहुमता ' असेच त्यांचे वागणे होते. डॉ सुभाष फुलंब्रीकर यांच्या सल्ल्यानुसार दोघांनी शहाद्याला यायचा निर्णय घेतला. शहादा हे नंदुरबार जिल्ह्यातील एक छोटेसे गाव. सातपुड्याच्या कुशीत वसलेले. जेमतेम पस्तीस चाळीस हजारांची लोकसंख्या. आदिवासीबहुल प्रदेश. जवळच तापी आणि नर्मदा या दोन पवित्र नद्यांचा परिसर. दक्षिण काशी म्हटले जाणारे प्रकाशा हे तीर्थक्षेत्र येथून जवळच. मध्य प्रदेश आणि गुजरातच्या सीमेवर असेलला हा प्रदेश. महाराष्ट्राच्या उत्तर सीमेवर असलेले टोकालगतचे गाव. वीज, टेलिफोन या सारख्या आधुनिक सुविधांना नुकताच गावात प्रवेश केला होता पण त्यांची सेवा जणू असून नसल्यासारखी असायची. विजेचा लपंडाव किंवा दीर्घकाळ गायब होणे, टेलिफोन लावण्यासाठी टेलिफोन ऑपरेटर जागेवर असणे वगैरे अनेक अडचणी होत्या. पण त्या सर्वांवर मात करून तेथेच राहायचे आणि लोकांना सेवा द्यायची हा निर्णय या दाम्पत्याने घेतला.

कुलकर्णी दांपत्य शहाद्यात आले आणि सेवा द्यायला सुरुवात केली. पण हे काम सोपे नव्हते. अनंत अडचणींचा डोंगर समोर उभा होता. त्यांच्याकडे येणारे रोगी मुख्यतः आदिवासी भागातील होते. अशिक्षित आणि अज्ञानी. त्यांना एखादी गोष्ट समजावून सांगणे आणि ती त्यांच्या गळी उतरवणे महाकठीण काम होते. त्यांचे असे अनेक गंभीर आणि गमतीदार अनुभव ' माझी डॉक्टरकी ' या पुस्तकात आपल्याला वाचायला मिळतील. सलाईन लावण्याची देखील सुविधा शहाद्यात उपलब्ध नव्हती. तीव्र निर्जलन ( शरीरात पाण्याची कमतरता ) झालेल्या रुग्णांना सलाईन लावण्यासाठी दूर धुळ्याला जावे लागे. काही रुग्णांमध्ये तेवढीही शारीरिक शक्ती आणि आर्थिक कुवत नसायची. **(क्रमशः)**



# आनंदी पहाट

## दुखःद आठवणी विसरण्याचा प्रयत्न करावा

आधुनिक केसरी

आपल्या गत आयुष्यात रममाण व्हायला आपल्याला प्रत्येकालाच हवे असते, ते अधिक प्रियही असते. आपल्या प्रत्येकाच्याच साठवणीतल्या अनेक आठवणी असतात. हर्षाच्या-स्पर्शाच्या, घरच्या-दारच्या, प्रीतीच्या-मैत्रीच्या, स्पर्धेच्या-बक्षिसांच्या, शाळेच्या-कॉलेजच्या, बालपणीच्या-तारुण्याच्या; अशा एक नाही तर अनेकविध आठवणीत आपल्या अंतर्मनाला सुखावण्यासाठी अनेकदा त्या आपण स्मरत असतो. ह्यांत काही आठवणी सुखाच्या-दुःखाच्या, रागाच्या-वादाच्या, विरहाच्या-प्रहाराच्या, प्रयासाच्या-त्रासाच्या, मानाच्या-अपमानाच्या अशा मिश्र स्वरूपाच्याही असतात. कोणत्या आठवणी आपल्या अंतर्मनासमोरून कधी तरळून जातील, हे काही ठरलेले अथवा आपण ठरवलेले नसते. अनेकदा काही घटना आपण कितीही आठवायच्या ठरवल्या तरीही नीट, पूर्णपणे आठवता येतातच असे नाही; तर काही घटना मात्र अनावधानाने, आपोआप आपल्या डोळ्यासमोर पुनःश्च यायला लागतात. आपण वापरलेल्या वस्तू, आपापसांत झालेला संवाद, घडलेल्या गप्पागोष्टी, त्या दरम्यानच्या शारीरिक हालचाली, आपापले हावभाव अशा अनेकविध गोष्टी आठवायला सुरुवात होते. ह्या आठवणींचे आपल्याशी एक जिव्हाळ्याचे नातेच निर्माण झालेले असते. आपले जगण्यापलीकडचे जीवन आनंदायी करण्याचे काम अनेकदा ह्या अशा आठवणीच करत असतात. काही आठवणी तर रात्री झोपेत आपल्याला पडलेल्या स्वप्नांच्या असतात. काहीवेळा तर ह्या आठवणीमध्ये आपण इतके रममाण झालेले असतो, कि वास्तवातले आणि वर्तमानातले कित्येक क्षण आपले फक्त शरीर प्रचीती घेत असते, पण मनाला त्याची अनुभूतीच मिळत नसते. "आठवणी म्हणजे आनंदाचे कंद", हे एकीकडे आपण अनुभवत असतो, पण त्या आठवणींत आपण स्वतः किती व्यस्त व्हायचे, ह्याचे भान राखणे देखील महत्वाचे ठरते. जोपर्यंत काही घडत आहे, तो पर्यंत सर्व ठीक आहे; पण जेव्हा काही बिघडेल तेव्हा मात्र निस्तरणे मुश्कील ठरू शकते. ह्याची जाणीव आपल्याला होणे अधिक महत्वाचे आहे.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

## कोण वाली ?

रंगुनिया गेला | भाव या जीवाचा ||
क्लेश अंतरीचा | दूर झाला ||१||

पाहता विठ्ठला | रूप हे सगुण ||
शुद्ध झाले मन | देवा माझे ||२||

आता न कैसी | उरलीसी आशा ||
जीवाची या दशा | मुक्त झाली ||३||

लटक्या संसारी | गुंतूनी पडलो ||
देह झिजवीलो | फुका देवा ||४||

नात्यांचा पसारा | स्वार्थाचा बाजार ||
अनाथ बेजार | माय जाता ||५||

कळो आले आता | खेळ सारा तुझा ||
तुजवीन माझा | कोण वाली ||६||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# “निरुपण”

आधुनिक केसरी

## वाजे नामाची बासुरी।।


जळली रे विघ्ने सारी। पळाली संकटे भारी।
गर्जल्या रे दिशा चारी। वाजे नामाची बासुरी।।
जाताती पळूनी अरी। फिरती स्वये माघारी।
रेणुका झाकणी धरी। आपुल्या रे भक्तावरी।।
येता अंबेच्या मंदिरी। चढता गड पायरी।
पोचलोसे तीरावरी। भक्तीच्यारे सागरी।।
जन आम्हासी विचारी। किती असे येथ बारी।
भक्तीपास हाती धरी। हास थेट दरबारी।।



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# काव्य-चरितावली

## वंदना श्रीचरणा



आधुनिक केसरी

श्रीगणेशदेवा, विद्यादेवी सरस्वती
वंदन करितो, करीतो विनवणी
काव्यलेखनास लाभो सदा गती
असावी कृपा ही प्रार्थना चरणी ।।

रेणुकामाता,आईभवानीस नमन
कोल्हापूरच्या अंबाबाईचे स्मरण
तिरुपतीबालाजीचे स्पर्शीतो चरण
चरीतलेखनास द्यावे काव्य स्फुरण।।

भक्तवत्सल श्रीसद्गुरू माऊली
मज लाभली त्यांची कृपासावली
हात जोडुनी करी तुम्हा विनवणी
प्रासादिक रसाळ व्हावी लेखणी ।।
दीपप्रतिभेचा श्रीगुरूंनीच लाविता
कवीअरुणदास लेखना सिद्ध झाला ।।



अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

# मनाचे श्लोक

आधुनिक केसरी

**गतीकारणे संगती सज्जनाची।**
**मती पालटे सूमती दूर्जनाची।**
**रतीनायिकेचा पती नष्ट आहे।**
**म्हणोनी मनातीत होऊनी राहे।।१२९।।**

**अर्थ :** सज्जनाच्या संगतीने बुध्दीमध्ये पालट होऊन उत्तम गती प्राप्त होते. कामवासना आयुष्याचा घात करते म्हणून माणसाने मनाला कामवासनेच्या आधीन होऊ देऊ नये.

**विवेचन :** कोणत्याही प्रवासाला निघताना अनेक गोष्टी ध्यानात घ्याव्या लागतात. प्रवासात कोणत्या वाहनाने करावा ? आपल्या सोबत कोण असणार आहे ? कोणत्या गोष्टी सोबत घ्याव्या लागतील ? काही औषधे सोबत ठेवावी लागतील का ? प्रवासात अनोळखी व्यक्तींवर विश्वास ठेवू नये, आपल्या चीजवस्तू दुसऱ्यांना दाखवू नये, अशा अनेक गोष्टींचा विचार करावा लागतो.

याच अनुषंगाने परमार्थ मार्गावर प्रवास करताना आपले गुणदोष तसेच आपले बोलणे यावर आवर घालावा लागतो. ज्याने जीभ जिंकली त्याने अर्धा परमार्थ जिंकला असे संत वचन आहे. मनुष्याने त्यामागील मर्म जाणून घेतले पाहिजे. विकार आणि वासनेच्या आहारी जाऊन काय होऊ शकते याची कल्पना मनुष्य करू शकतो. विश्वामित्र ऋषींसारख्या श्रेष्ठ योग्याला वासनेपासून दूर जाता आले नाही, तर आपल्या सारख्या सामान्य मनुष्याची स्थिती काय होऊ शकेल ?

मागील श्लोक मनुष्याने कोणती वासना अंगी बाणवावी यासाठी आहे, तर या श्लोकात समर्थ आपल्याला वासनेपासून दूर जायला सांगत आहेत. समर्थ आपल्याला सत्संगतीचा महिमा (परिणाम) समजून सांगत आहेत. दुसऱ्याच्या अत्तर लावताना त्यातील थोड़ेफार अत्तर आपल्या हातालाही लागत असते. ज्या माणसाच्या जवळ गेलो अथवा ज्याच्या सहवासात गेलो की मनुष्याला कोणतेही भौतिक सुख मागावेसे वाटत नाही, आणि तरीही त्याचा सहवास हवाहवासा वाटतो, त्याला संत म्हणता येईल. अशा सत्पुरुषाची किंवा सतांची भेट झाली तर आपला जन्म सुफल होतो.



शांतीब्रम्ह संत एकनाथ एकनाथी भागवताच्या नवव्या अध्यायात म्हणतात, "एव इंद्रियाशी विषयासक्ती ॥ तेणे वासना दृढ होती ॥ त्या देह देहांतरा प्रती । पुरुषाशी नेती सर्वथा ॥३१९॥ यालागी करावया विषय त्यागु ॥ अवश्य छेदावा देहसंगु ॥ ईये आर्थी मनुष्यदेह चांगु । ज्ञान विभागु या देही ॥३२०॥"

सध्याचा काळ हा Face book, instagram, अनेक web series आणि अशा प्रकारच्या विविध सामाजिक माध्यमांचा आहे असे म्हटले तर वावगे होणार नाही. 'वासना' कशाप्रकारे चाळवल्या जाऊ शकतात याचं उत्तम शिक्षण देण्यासाठी हा सर्व खटाटोप सुरूy असावा असे वाटते.

आजची तरुण पिढी या सर्वांच्या आहारी जात आहे. सध्या आधुनिकतेच्या आणि मज्जेच्या (thril) नावाखाली अनेक चित्रविचित्र गोष्टी घडत आहेत. एकपत्नी अथवा एक पती व्रत आरोग्याच्या दृष्टीने उचित आहे, परंतु चुकीच्या पद्धतीने त्याचा प्रचार झाल्याने हा विचार आता प्रतिगामी झाला आहे अशी स्थिती आढळते, यावर रामबाण उपाय आहे प्रभू श्रीरामाचे चरित्र. तरुण पिढीस ते आधुनिक पद्धतीने सांगावे लागेल. ही आपली सर्वांची जबाबदारी आहे. सुमारे ९०% जाहिरातीत अर्ध नग्न स्त्री दाखवली, मग ते उत्पादन कोणतेही असो.... याबद्दल पुरोगामी एकही अवाक्षर काढताना दिसत नाहीत, कोणतीही स्त्री मुक्ती संघटना आंदोलन करीत नाही.... वाचकांनी यावर अवश्य मंथन करावे.

दास चैतन्य
संपर्क क्र. ८३८००१९६७६

समर्थांनी सुमारे चारशे वर्षांपूर्वी सांगितलेलं आज तंतोतंत लागू होत आहे. 'रती आणि मदनाचा' उपयोग सुप्रजा निर्माण करण्यासाठी व्हावा, त्यातून वासना वाढून समाजात अनाचार वाढण्यासाठी होऊ नये असे समर्थांना सुचवायचे असावे. मोबाईल डाटा' चे बटण योग्य वेळी बंद करण्याचा विवेक आपल्याला तरूणाईच्या मनात रूजवावा लागेल. हे काम खास करून पालकांना, शिक्षकांना आणि समाजसेवकांना एकत्र येऊन करावं लागेल, या गोष्टी सरकारवर सोडून जमणार नाही. सत्संगतीचा परिणाम हा बरेच वेळा स्मशान वैराग्याप्रमाणे असतो. एखाद्या संताचे कथाकीर्तन ऐकले, तर त्या वेळेपुरत त्याचे सांगणे आपल्याला खरे वाटते. कधी कधी आपले अष्टसात्विक भाव जागृत होतात, मानसिक शांतता लाभते. पण एकदा तेथून बाहेर पडलो की पूर्णपणे संसारात बुडून जातो. देवाची प्राप्ती होण्यासाठी आपल्या बाह्यरंगापेक्षा अंतरंगात बदल होणे अत्यावश्यक आहे. अंतरंगात बदल घडण्यासाठी अखंड अनुसंधान आणि आपल्या सदगुरुंची कृपा प्राप्त व्हावयास हवी.

आजपर्यंतचा इतिहास बघितला तर बरेच साधक खूप काही कमावतात पण क्षुल्लक वासनेपायी त्यांना परत जन्म घ्यावा लागतो. त्यांना भ्रष्टयोगी असे म्हणतात. कोणतीही वासना वाईटच. भगवान शंकरानी मदन जाळला असे पुराणात वर्णन आहे. तेंव्हापासून हा मदन प्रत्येकाच्या मनात अदृश्य रूपानी राहतो. आपल्या साधनेत व्यत्यय अणायला त्याला आवडते. म्हणून आपण जरा तटस्थ राहून आपला दिनक्रम चालू ठेवावा. मनाकडे दुर्लक्ष करावे. सरावानी हे आपल्याला नक्कीच जमेल.

**|| जय जय रघुवीर समर्थ ||**





आधुनिक केसरीच्या 'ज्योतिर्मय' दिवाळी अंकाचे प्रकाशन करताना प्रोफेसर डॉ. दिनकर माने, जिल्हा माहिती अधिकारी मुकुंद चिलवंत. सोबत प्राचार्य नामदेव सानप, डॉ. संजीवकुमार सावळे, मुख्य संपादक डॉ. प्रभू गोरे, व्यवस्थापकीय संपादक संजय व्यापारी.

# आधुनिक केसरीचा 'ज्योतिर्मय' म्हणजे सुंदर विचारांचे दर्पण : प्रो. डॉ. दिनकर माने

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** दिवाळी अंक महाराष्ट्राच्या संस्कृतीमध्ये साहित्याचा बदलत जाणारा चेहरामोहरा आहे आणि आधुनिक केसरीचा 'ज्योतिर्मय' म्हणजे एक सुंदर विचारांचे दर्पण आहे, असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील जनसंवाद व वृत्तपत्रविद्या विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ. दिनकर माने यांनी केले. आधुनिक केसरीच्या 'ज्योतिर्मय' दिवाळी अंकाचे प्रकाशन बुधवारी प्रोफेसर डॉ. दिनकर माने यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी प्राचार्य नामदेव सानप, डॉ. संजीवकुमार सावळे, मुख्य संपादक डॉ. प्रभू गोरे, व्यवस्थापकीय संपादक संजय व्यापारी यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना प्रोफेसर डॉ. दिनकर माने म्हणाले की, आधुनिक केसरीच्या 'ज्योतिर्मय'मधून मान्यवर साहित्यिकांनी साहित्याची केलेली मांडणी अप्रतिम आहे आणि ही मांडणी आपल्या मनाला आविष्कारित केल्याशिवाय राहत नाही. दिवाळी अंकाच्या भाऊगर्दीत वैचारिक अधिष्ठानाला अभिप्रेत साहित्य देणारा ज्योतिर्मय दिवाळी अंक ठरला आहे. दररोजचा आधुनिक केसरी अंकही मनाला प्रगल्भता देत आपल्याला सकारात्मक आनंद- तरंग देत आहे. ज्योतिर्मयची उत्तम बांधणी, मनाला मोहित करून जाणारे मुखपृष्ठ आणि संपादक मंडळांची कल्पकता नाविण्यपूर्ण ठरली आहे. ही सकारात्मक विचारांची देवाणघेवाण वाचन-लेखन प्रक्रियेला निश्चितच बळ देत आहे.

## लक्की चावला भाजपा सोशल मीडिया सहसंयोजकपदी

आधुनिक केसरी न्यूज



**नागपूर :** भारतीय जनता पार्टीच्या सोशल मीडिया सेलच्या प्रदेश सहसंयोजकपदी नागपूर येथील सरदार लक्की सिंग चावला यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी श्री. चावला यांना नियुक्तीचे पत्र दिले आहे. त्याचबरोबर छत्रपती संभाजी नगरच्या शहर जिल्हाध्यक्षपदी शिरीष बोराळकर यांची नियुक्ती करण्यात आल्याचे भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे जाहीर केले आहे.

## प्रमोद मुनीजी महाराज यांचे औरंगाबादकडे प्रस्थान

आधुनिक केसरी न्यूज

**लासूर स्टेशन :** जैन संत उपप्रवर्तक पंडितरत्न परम पूज्य प्रमोदमुनीजी महाराज यांचे मंगळवारी सकाळी लासूर स्टेशन येथुन औरंगाबाद कडे प्रस्थान झाले.आगामी चार महिने चातुर्मास निमित्त महाराज लासुर येथील स्थानकात होते. महाराजाचे दररोज  प्रवचन,दर्शन देखील सुरू होते.जिल्ह्यातून तसेच पर जिल्ह्यातून देखील हजारो भाविकांनी महाराजाचे दर्शन घेतले. तसेच सत्तर दिवस निरंतर नवकार मंत्र जप साधना देखील घरोघरी सुरू होती.आज प्रस्थान कार्यक्रमा प्रसंगी लासुर येथील प्रतिष्ठित व्यापारी केशरचंद कोठारी यांनी महाराजाना मानाची शाल अर्पण केली. यावेळी सकल जैन समाज मोठ्या संख्येने उपस्थित होते.तसेच वाहतुकीला अडथळा येऊ नये म्हणून शिल्लेगाव पोलीसाचा देखील चोख बंदोबस्त होता.





## खा. संजय राऊत यांचा जामीन मंजूर होताच गुलमंडीवर फोडले फटाके

### शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांनी केला ईडीचा निषेध

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** शिवसेना नेते खासदार संजय राऊत यांच्यावर ईडीने केलेली कारवाई अवैध असल्याचा निर्वाळा सत्र न्यायालयाने दिला आहे. आज अखेर खासदार संजय राऊत यांचा जामीन मंजूर झाला. यामुळे शिवसेना नेते, खासदार संजय राऊत यांचा जामीन मंजूर झाल्यानंतर औरंगाबादचे हृदयस्थान गुलमंडी येथे फटाके फोडून आणि मिठाई वाटून आनंद साजरा करण्यात आला. यावेळी ईडीने सूडबुद्धीच्या हेतूने केलेली कारवाईचा शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांनी निषेध केला. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख किशनचंद तनवाणी, माजी महापौर नंदकुमार घोडेले, विधानसभा संघटक गोपाळ कुलकर्णी, तालुकाप्रमुख रघुनाथ घरमोडे, शिक्षक सेनेचे विठ्ठल बदर, उपशहरप्रमुख सुगंधकुमार गडवे, पप्पू व्यास, माजी नगरसेवक अजय चावरीया, बंटी जैस्वाल, संदीप हिरे, सुरेश व्यवहारे, विठ्ठल मिसाळ आदींसह शिवसैनिक उपस्थित होते.




# मैं झुकेगा नहीं

आधुनिक केसरी

हिमालच प्रदेशात सध्या भाजपाचे सरकार असून हे कायम ठेवण्याचे आव्हान पक्षासमोर आहे. हिमाचल प्रदेशात दर पाच वर्षांनी सत्ताबदलाचा अुनभव असून, यावेळी जनतेचा कल काय असेल हे पाहणे औत्सुक्याचे असेल. मात्र भाजपाला हिमाचल प्रदेशात सध्या बंडखोरांचा सामना करावा लागत आहे. विशेष बाब म्हणजे, बंडखोर उमेदवार कृपाल परमार यांनी माघार घेण्यासाठी स्वत: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी फोन केल्याचा दावा केला आहे. त्यांच्यातील संभाषणाची ऑडिओ क्लिप सध्या व्हायरल झाली आहे. भाजपाचे माजी खासदार परमार यांनी फतेहपूर येथून अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढणार असल्याचे जाहीर केले आहे. ६३ वर्षीय परमार हे गेल्या एका वर्षापासून पक्षावर नाराज आहेत. पोटनिवडणुकीत आपल्याला उमेदवारी न दिल्याने त्यांनी नाराजी जाहीर केली होती. त्यांनी आपल्या बंडखोरीसाठी भाजपाध्यत्र आणि आपले जुने वर्गमित्र जे पी नड्डा यांना जबाबदार धरलं आहे. नड्डा यांनी १५ वर्षं माझा अपमान केला, असे परमार यांनी एनडीटीव्हीशी बोलताना सांगितले. कथित फोन कॉलमध्ये ते पंतप्रधांनाही हे सांगत आहेत. मात्र या फोन कॉलची बंधी भाजपा किंवा पंतप्रधान कार्यालयाने पुष्टी केलेली नाही. मी निवडणूक लढणाक आहे, पण भाजपा उमेदवार म्हणून नाही. ही माझ्यातील आणि काँग्रेस उमेदवारातील लढाई आहे, असे परमार म्हणाले आहेत. दरम्यान या कथित फोन कॉलमध्ये परमार मोदींकडे नड्डा यांनी गेली अनेक वर्षं आपल्याला बाजूला केल्याचा आरोप केला आहे. "मोदीजी, नड्डांनी १५ वर्ष माझा अपमान केला, असे ते या फोन कॉलमध्ये सांगत आहेत. यावेळी परमार यांनी आपण या फोन कॉलला कमी लेखत नसून, देवाचा संदेश असल्याचे म्हटले आहे. एनडीटीव्हीशी बोलताना, परमार यांनी हा खोटा कॉल नव्हता असा दावा केला आहे. ३० ऑक्टोबरला मोदींनी स्वत: आपल्याला फोन केल्याचे त्यांचे म्हणणे आहे. आम्ही गेल्या २५ वर्षांपासून एकमेकाला ओळखतो. जेव्हा ते (मोदी) हिमाचल प्रदेशचे प्रभारी होते तेव्हा मी उपाध्यक्ष होतो. आम्ही एकत्र भरपूर प्रवास केला असून, एकत्र राहिलोही आहोत. माझे त्यांच्यासोबत कौटुंबिक संबंध आहेत. मी त्यांना देव मानतो, असे परमार म्हणाले आहेत. "मी अद्यापही निवडणुकीच्या रिंगणात आहे. जर तुम्ही एक सेकंद आधी जरी फोन केला असता तर मी उमेदवारी अर्ज मागे घेतला असता. पण मला आताच माहिती मिळाल्याचे त्यांचे म्हणणे होते. त्यांना इतक्या उशिरा सांगणे हादेखील कटाचा भाग असू शकतो," असा आरोप परमार यांनी केला. २०१७ मध्ये नेमके काय झाले याची मला कल्पना नाही. कोणीही मला काय झाले याबद्दल सांगितले नाही. त्यांनी मला उमेदवारी देणे बंद केले. पक्षातील लोक माझी खिल्ली उडवू लागले होते, असे परमार यांचे म्हणणे आहे. हिमाचल प्रदेशातील ६८ जागांसाठी निवडणूक होत असून यामधील ३० जागांवर भाजपाला बंडखोरांचा सामना करावा लागणार आहे. ८ डिसेंबरला निवडणुकीचा निकाल जाहीर होणार आहे.

# ' सूर्या ' नावाच्या युगाचा उदय !



रवींद्र मुळे
संपर्क क्र : ९४२२२२१५७०

आधुनिक केसरी

**आता जेव्हा सुर्यकुमार फलंदाजीला येतो तेव्हा स्थिर होणे, नंतर हळू हळू फटके मारणे, वेग वाढवणे हे तंत्र त्याला माहीतच नाही असे वाटायला लागते . एखादी गाडी स्टार्टर मारली की लगेच टॉप गियर पडावा तसा तो खेळायला लागतो. त्यात जसे , काही त्याचे अफलातून स्वतःच तयार केलेले फटके आहेत तसेच कालचा त्याचा स्ट्रेट ड्राईव्ह थेट गावस्कर, सचिनची आठवण करून देणारा आहे. Extra cover वरून त्याने मारलेला षटकार विराट, रोहित च्या तोडीचा आहे. त्यामुळेच वसीम आक्रंम सारख्याला सुर्या हा कुठल्यातरी वेगळ्याच जगातून आला आहे असे भासते आणि ऐ बी डिलिव्हरस ला पण त्याची तोंड भरून स्तुती करावी वाटते.**

अपेक्षेप्रमाणे झिम्बाब्वेचा भारतीय संघाने पराभव केला, भारत सेमी फायनलला पोहचला! पण सामन्यानंतर चर्चा सर्वत्र होती ती सुर्यकुमार यादव याच्या फटकेबाजीची !

एक दिवसीय विश्वकपच्या १९७९ सालच्या दुसऱ्या स्पर्धेत शेवटचा चेंडू होता आणि फलंदाजी करत होता सर विव्ह रिचर्ड्स ! त्याचे शतक पूर्ण झालेले आणि चेंडू त्याला फुटबॉल सारखा दिसत होता. त्यामुळे त्याला रोखायचे कसे हा प्रश्न होता ! समोर बहुतेक गॅरी गिलमोर गोलंदाज होता. त्याने चेंडू ऑफ SIDE ला जास्तीत जास्त क्षेत्ररक्षक ठेवून त्या दिशेने GOODLENGTH चेंडू उसळला आणि कव्हर , EXTRA कव्हर, थर्ड मॅन, पॉईंट हे सावध झाले पण चेंडू SQUARE लेग च्या दिशेने कधी भिरकावला गेला कळलेच नाही. अनेक वर्षे त्या फटक्याची चर्चा होत राहिली होती खऱ्या अर्थाने फलंदाजी चे स्वरूप बदलणारा आणि नवे युग निर्माण करणारा तो फटका होता. असे फटके आणि असा खेळ क्षेत्ररक्षण आणि गोलंदाजी याच्या मर्यादा स्पष्ट करतो आणि समोरचा कर्णधार असहाय्य झालेला आम्ही बघतो . रिचर्डस पुढे असे हतबल लोक झालेले आपण बघितले . लाराचे पदलालित्य आपण बघितले आहे. ऐन भरात सचिन पुढे लोक असेच हतबल होत असत. अगदी कालच्या विराटच्या पाकिस्तान बरोबरच्या खेळात आम्ही हे अनुभवले. त्याच धर्तीवर काल सुर्यकुमार यादव खेळताना दिसत होता. भारताच्या सुर्यकुमारची फलंदाजी बघितल्यावर रिचर्ड्सचा तो फटका आणि अशा विलक्षण आठवणी जाग्या झाल्या!

एका फटक्याला धावते वर्णन करणारे गावस्कर म्हणून गेले शॉर्ट ऑफ दि एज ! शेवटच्या षटकात लेग SIDE चे क्षेत्ररक्षक सगळे सीमारेषेपासून थोडे आत आणले होते. चेंडू ऑफ च्या बाहेर पडतील आणि लेगला मारलेला फटका चुकला की झेल होईल ही कल्पना होती. आणि ऑफला मारला तर क्षेत्ररक्षक सीमारेषेवर चौकार अडवतील अशी नीती होती. पण सुर्यकुमारची कमाल म्हणजे अशा परिस्थिती मध्ये लाँगलेग, फाईन लेग आणि SQUARE लेग असे दोन षटकार आणि एक चौकार त्याने ऑफ स्टॅम्पच्या बाहेर तिरकस जाणाऱ्या चेंडूवर वसूल केले. खरोखर त्या दिवशीची त्याची बॅटिंग क्रिकेटमध्ये नवीन युग निर्माण करणारी ऐतिहासिक ठरली आहे.




या सीमारेषेवर चेंडू लेग स्टॅम्पच्या बाहेर अथवा लेग स्टॅम्पवर किंवा अगदी मधल्या स्टॅम्पवरून फेकून देता येतो पण अलीकडे जे नवीन तंत्र विकसित झाले आहे त्यातील कालचा सूर्याचा खेळ हा सर्वोत्तम अविषकार होता असे म्हणावे लागेल . असे प्रदर्शन करण्यासाठी खूप मोठी साधना लागते. मनगटांची हालचाल आणि पदलालित्य याचा समन्वय आणि TIMING लागते. शेवटच्या षटकात हे फटके मारताना थेट त्याच्या पायाची हालचाल अशी होती की सहजपणे वाइड OUTSIDE ऑफ स्टॅम्प पडलेला असून ही चेंडू पर्यंत त्याचा पाय पोहचत होते. शरीरामध्ये स्प्रिंग बसवल्यासारखा तो फलंदाजी करताना वावरत असतो.

१९७१ विंडीज दौऱ्यानंतर गावस्कर युग अवतरले. १९७८ पाकिस्तान दौऱ्यानंतर कपिल युग अवतरले , ९० नंतर सचिन युग , २००७ च्या विश्वचषक नंतर धोनी युग , २०१२ नंतर विराट युग आता तब्बल १० वर्षांनी या विश्वचषकाच्या साक्षीने एक युग येऊ घातले आहे ते म्हणजे ' सुर्या युग ' ! अर्थात निवड समितीने वेळीच लक्ष घातले असते तर हे युग लवकर अवतरले असते आणि अजून दीर्घकाळ बघायला मिळाले असते.

एके काळी सलिम दुराणी षटकार मारायचा तर आम्हा भारतीयांना त्याचे किती कौतुक होते. कारण सी के नायडू किंवा मुश्ताक अली सोडल्यास भारतीय खेळाडुकडून आक्रमक फलंदाजी बघण्यासाठी आम्हाला दीर्घकाळ वाट पहावी लागली. वेंगसरकर च्या रूपाने आम्हाला असा खेळाडू मिळाला होता पण कसोटी मध्ये स्थान पक्के करताना त्यातला आक्रमक पणा कधी संपला कळलेच नाही. संदीप पाटीलमध्ये सातत्य नव्हते. युवराज हे अलीकडील एक आक्रमक वृत्तीचे आणि खेळाचे आनंद देणारे उदाहरण !

पण आता जेव्हा सुर्यकुमार फलंदाजीला येतो तेव्हा स्थिर होणे, नंतर हळू हळू फटके मारणे, वेग वाढवणे हे तंत्र त्याला माहीतच नाही असे वाटायला लागते . एखादी गाडी स्टार्टर मारली की लगेच टॉप गियर पडावा तसा तो खेळायला लागतो. त्यात जसे , काही त्याचे अफलातून स्वतःच तयार केलेले फटके आहेत तसेच कालचा त्याचा स्ट्रेट ड्राईव्ह थेट गावस्कर, सचिनची आठवण करून देणारा आहे. EXTRA COVER वरून त्याने मारलेला षटकार विराट, रोहित च्या तोडीचा आहे. त्यामुळेच वसीम आक्रंम सारख्याला सुर्या हा कुठल्यातरी वेगळ्याच जगातून आला आहे असे भासते आणि ऐ बी डिलिव्हरस ला पण त्याची तोंड भरून स्तुती करावी वाटते.

असे खेळाडू विक्रम किती करतात या पेक्षा खेळपट्टीवर असताना त्या खेळा बद्दल प्रेक्षकांच्या मनात जे आकर्षण निर्माण करतात हे महत्वाचे असते. त्यामुळे त्यांच्या मुळे त्या खेळाची लोकप्रियता वाढत असते. पेले, मॅरेडोना यांनी फुटबॉल लोकप्रिय केला. बोल्ट ने ATHELITICS लोकप्रिय केले . बेकर, लेंडल, संप्रस आणि नदाल, फेडरर यांनी टेनिस लोकप्रिय केले . असे खेळाडू हे त्या खेळाची लोकप्रियता वाढवणारे खऱ्या अर्थाने दूत असतात. सुर्या म्हणतो माझ्या खेळाने भारताला जास्तीत जास्त विजय मिळवून देणे हेच माझे ध्येय आहे ! त्याच्या खेळाची हीच प्रेरणा चिरंतन राहावी आणि लोकांना सुर्या युगाचा अधिक अधिक आनंद मिळत राहो हीच सदिच्छा!



# आई- वडील हेच कुटुंबाचे भूषण !

आधुनिक केसरी

**आजच्या सोशल जमान्यात नात्यात दुरावा वाढत चालला आहे.एकत्र कुटुंब पद्धती मागे पडत चालली आहे.जन्मदात्यांचा संभाळ करणे हे प्रत्येकाचे कर्तव्यच आहे.आजच्या पिढीने आई वडीलांची सेवा केली पाहिजे.आई वडील हीच आपली संपत्ती आहे. प्रत्येक आई वडील आपल्या मुलाबाळांसाठी रात्रंदिवस कष्ट करत असतात.याची जाणीव प्रत्येकाने ठेवली पाहिजे. नदीला जशी पाण्याची ,शरीराला जशी आत्म्याची गरज असते.तसेच आई वडील हे कुटुंबाचे भुषण आहे.हे लक्षात ठेवा.**

कोणतीच अपेक्षा न ठेवता आई वडील आपल्या मुलाबांळांसाठी राबराबतात.तळहाताच्या फोडाप्रमाणे आपल्याला जपतात.लहानाचे मोठे करतात.यासाठी त्यांचे निस्वार्थ ,निष्काम प्रेम व कोणतीही अपेक्षा न ठेवता काम करणारी व्यक्ती म्हणजे आई वडील होय. आई वडीलांच्या प्रेमापुढे जगातील सार्या गोष्टी शुन्य आहे.जगात सर्व काही विसरा पण आई वडीलांना विसरू नका.

आईच्या गर्भात ९महीने आई आपल्याला प्राणपणाने जतन करते .या दुनियेत येताना आपले बोट धरून आयुष्याची मार्गक्रमणा करण्यास मार्गदर्शक ठरते.आई वडीलांच्या प्रेमाने आपल्यात नवचैतन्य संचारते.आई वडीलांनी मिठी मारताच सारे दुःख विसरायला होते.हे मात्र तितकेच खरे आहे.

आपण नेहमी म्हणतो मातृदेव भव,पितृदेवभव खरोखर आई वडीलांसारखे कोणतेही दैवत नाही.आई वडील हे आपले दैवत आहे. आईची ममता धरणीमातेपेक्षाही महान आहे.या जगात कोण किती पुढे गेलेला पाहू शकत नाही.मात्र आई वडील असे आहेत जे आपल्या मुलाला आपल्यापेक्षाही पुढे गेलेला पाहून आंनदी होतात. प्रत्येकाच्या जीवनात व्यक्तीमत्व घडविण्यात आपल्या आई वडीलांच्या खारीचा वाटा आहे.दुबळा असो ,वा अपंग असो आईवडीलांना सारी मुले सारखीच असतात.या जगात आईवडीलांएवढे प्रेम कोणी करू शकणार नाही .आई वडीलांनी लावलेली माया ही आभाळाऐवढी आहे .ही माया ,त्यांनी केलेले प्रेम हे पैशाने कधीच विकत घेता येणार नाही.

जीवन जगत असताना आपल्यावर कुणाचे ना कुणाचे ऋृण असतात.मात्र आई वडीलांचे ऋृण असे आहे की ते आपल्याला या जन्मात देखील चुकवता येणार नाही.आपल्या मुलाबाळांनी मोठे व्हावे,शिकून नाव कमवावे, आपल्याला त्यांचे सुख पाहता यावे. यासाठी सतत झिजत असतात.कारण त्यांची एकच इच्छा असते की आपला सारा जन्म मुलाबाळांच्या प्रपंचासाठी जावा.यासाठी मात्र ते कोणताही मोबदला घेत नाही.

मात्र आज सभोवताली जर नजर टाकली तर आई वडीलांना वृद्धाश्रमात टाकण्याचे फॅड वाढले आहे.कौटुंबिक जिव्हाळा कमी होत चालला आहे, विभक्त कुटुंब पद्धतीमुळे आई वडील,आजीआजोबा क्वचित पहायला मिळतात. खरं म्हणजे वडील हे कुटुंबाचे प्रमुख आहेत .परंतू वृद्धाश्रमात आई वडीलांना पाठवावे लागते ही शोकांतिका आहे.ज्या घरात आई वडील आहेत तिथे काहीच कमी पडत नाही.

वृद्धाश्रम ही आपली संस्कृती नाही. कुटुबासारखं कोणतंच मोठं धन नाही. आई वडील हीच आपली संपत्ती आहे.ज्या घरात आहे वडील आहेत तिथे प्रेमभाव आहे.तिथेच ऐकोपा राहतो.कुटुब टिकून राहते.या जगात सर्व काही पैशाने मिळेल पण आई वडील मिळणार नाही.मोठ्या पुण्याईने आपल्याला आई वडील मिळतात.त्यांचे आशिर्वाद आपल्यासाठी लाख मोलाचे असतात.

ज्यांचे आई वडील हयात नाही .त्यांनाच आई वडीलांचे महत्व कळते.आज आपण आहोत ते आई वडीलांमुळेच हे लक्षात ठेवा. आपलं शिक्षण,प्रगतीसाठी त्यांनी अनेक खास्ता खाल्ल्या आहेत .ही दुनिया त्यांच्यामुळेच आपल्याला पहायला मिळाली. हे विसरु नका. त्यांचा आदर राखा ,त्यांना मानसन्मान द्या.

विवाहानंतर आई वडीलांकडे दुर्लक्ष करता कामा नये.आई वडीलांना नेहमी वाटते आपल्या मुलाबाळांचा संसार चांगला व्हावा.आपणही त्यांच्याशी प्रेमाने गोड बोलले पाहिजे.त्यांना आपल्याकडून दुसरी काही अपेक्षा नसते.आई वडील ज्या घरात आहे तिथेच स्वर्ग आहे.इथेच पंढरी आहे.आई वडीलांची सेवा करण्यासारखे दुसरे कोणतेही पुण्य नाही.

संतोष दत्तू शिंदे
संपर्क क्र. 7721045845

जेव्हा बाळ रडतं तेव्हा सारख्या बिल्डिंगला समजते. परंतू जेव्हा आई वडील रडतात ना तेव्हा शेजार्यालाही थांगपत्ता लागत नाही.ही वास्तविकता आहे.आई वडील वयाने नाही तर काळजीने म्हातारे होतात .हे सत्य आहे.

आई वडीलांजवळ बसा ,त्यांची आदराने विचारपूस करा. त्यांच्यासठी प्रेमाचे दोन गोड शब्द बोला.आईवडीलांचे आपल्यावर खुप मोठे उपकार आहेत.हे विसरू नका. त्यांची सेवा करण्यासारखी दुसरी कोणतीही संधी नाही.म्हणूनच आई वडील हे कुटुंबाचे भुषण आहे.हे विसरू नका.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : MAH/2021/82566, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAH/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# वैज्ञानिक जागृती, वृत्ती व दृष्टिकोन निर्मिती!



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**विज्ञान क्षेत्रातील विशेष योगदानासाठी राष्ट्रीय आणि इतर पुरस्कारही जाहीर केले जातात. विज्ञानाची लोकप्रियता वाढवण्यासाठी विशेष पुरस्कारही ठेवण्यात येतात. विज्ञान दिनाची उद्दिष्टे- लोकांच्या दैनंदिन जीवनात वापरल्या जाणाऱ्या विज्ञानाचे महत्त्व सांगण्यासाठी विज्ञान दिन दरवर्षी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर साजरा केला जातो. मानवी कल्याणासाठी विज्ञान क्षेत्रात सर्व क्रियाकलाप, प्रयत्न आणि कृत्ये प्रदर्शित करणे. सर्व विषयांवर चर्चा करणे आणि विज्ञान क्षेत्रात विकास साधणे यांसाठी, नवीन तंत्रज्ञानाची अंमलबजावणी करण्यासाठी हे साजरे केले जाते. जगातील व देशांदेशातील वैज्ञानिक विचारांच्या नागरिकांना संधी देणे. लोकांना प्रोत्साहित करणे, विज्ञानाची दृष्टी बहाल करणे, तसेच विज्ञान आणि तंत्रज्ञान लोकप्रिय करणे आदी सांगता येतील. राष्ट्रीय विज्ञान दिनाचे मूळ उद्दिष्ट विद्यार्थ्यांना विज्ञानाकडे आकर्षित करणे, त्यांना प्रेरित करणे, विज्ञान आणि वैज्ञानिक कामगिरीबद्दल लोकांना जागृत करणे हा आहे.**

सद्याचे युग हे विज्ञानाचे युग आहे. त्यामुळे विज्ञानाच्या मदतीने दररोज नवनवे शोध लागत असतात. या शोधांचे महत्त्व आणि त्याचा उपयोग जगातील प्रत्येक व्यक्तीला कळावे, यासाठी संयुक्त राष्ट्रसंघ, सांस्कृतिक, वैज्ञानिक, शौक्षणिक संघटनेने १० नोव्हेंबर हा दिवस जागतिक विज्ञान दिवस म्हणून साजरा करण्याचे ठरवले. भारतात २८ फेब्रुवारी हा दिवस राष्ट्रीय विज्ञान दिवस म्हणून साजरा केला जातो. प्रसिद्ध वैज्ञानिक डॉ.सि.व्ही.रमन यांनी आपले शोध सन १९२८ साली जगापुढे मांडले. म्हणून त्या निमित्ताने २८ फेब्रुवारीला भारतात राष्ट्रीय विज्ञान दिवस साजरा केला जातो. जगात अनेक ठिकाणी या दिवशी वेगवेगळे कार्यक्रम आयोजित केले जातात. सन १९९९ साली आंतराष्ट्रीय स्तरावर हंगेरिच्या बुडापेस्ट शहरात सर्व प्रथम संयुक्त राष्ट्रसंघाकडून वैज्ञानिक दिन आयोजित करण्यात आला. यानंतर व्यापक स्वरुपात जागतिक स्तरावर सन २००१पासून वैज्ञानिक दिवस साजरा करायला सुरवात झाली. भारतरत्न सी.व्ही.रमन प्रसिद्ध शास्त्रज्ञ आणि देशाचे विज्ञान तंत्रज्ञान मंत्री डॉ.वसंत गोवारीकर यांनी विज्ञान जनजागृतीपर अनेक योजना सुरु केल्या. तसेच वैज्ञानिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल नोबेल पुरस्कार विजेते भारतातील एकमेव व्यक्ती सी.व्ही रामन यांच्या स्मृती प्रित्यर्थ भारतात राष्ट्रीय विज्ञान दिवसाला सुरवात झाली. जागतिक स्तरावर विज्ञान दिवस सुरू होण्याआधी भारतात राष्ट्रीय स्तरावर याची सुरूवात झाली होती हे महत्वाचे. शांती व विकासासाठी विज्ञानाचे महत्त्व हा सगळ्या मागचा हेतू आहे.




वैज्ञानिक दृष्टिकोन म्हणजे काय? तर कुठल्याही घटितामागचा कार्यकारणभाव समजून घेणे किंवा दोन घटनांमधील परस्परसंबंध तपासून पाहणे म्हणजे वैज्ञानिक दृष्टिकोन म्हणता येईल. अशी एकदम साधी-सोपी व्याख्या करता येईल किंवा असेही म्हणता येईल, की जेवढा पुरावा उपलब्ध आहे, तेवढाच विश्वास ठेवणे. एखादी गोष्ट सत्य आहे की नाही यासाठी वैज्ञानिक दृष्टिकोन म्हणजे निरीक्षण, तर्क, अनुमान, प्रचिती आणि प्रयोग या मार्गांनी ज्ञान आत्मसात करण्याची विज्ञानाची ही पद्धत आहे- १) जगात सुष्ट शक्तिमुळे चांगले आणि दुष्ट शक्तिमुळे वाईट घडते, असे अजिबात होत नाही. जे काही घडते, त्यामागे निश्चितच कारण असते आणि ते वैज्ञानिक दृष्टिकोनाच्याच आधारे शोधता येते. २) चमत्काराचा दावा, हे लोकांना मूर्खात काढण्याचे प्रभावी साधन आहे. कोणतीही गोष्ट कारणाशिवाय घडत नाही. चमत्कार करणारे बदमाश, त्यावर विश्वास ठेवणारे मूर्ख असतात आणि याला विरोध न करणारे भ्याड असतात. चमत्करामागे हातचलाखी वा विज्ञान यापैकी काहीतरी एक असतेच. ३) वैज्ञानिक दृष्टिकोन शब्दप्रामाण्य म्हणजे कुणी एका मोठ्या व्यक्तीने सांगितले म्हणून खरे मानायचे, हे नाकारतो. वैज्ञानिक दृष्टिकोन ग्रंथप्रामाण्य म्हणजे कुणाच्या तरी पुस्तकात लिहलंय म्हणून ते चिकित्सा न करता स्वीकारणे नाकरतो. ४) आजवर झालेली माणसाची प्रगती केवळ विज्ञानाच्या आधारे झालेली आहे. विज्ञान नेहमीच नम्र असते, ते नवनवीन बदलांना आत्मसात करते. धर्माप्रमाने ते अंतिम सत्याचा दावा अजिबात करत नाही. ५) मानवाचा आजवरचा इतिहास हा श्रद्धा तपासण्याचा इतिहास आहे. विज्ञानामुळे झालेले बदल धर्माला काळाच्या ओघात स्वीकारावे लागले आहेत. आजवर धर्माने एकही मानवी प्रगतीसाठी नविन शोध लावलेला नाही. ६) आज समाजात अनेक गोष्टी यामागे विज्ञान आहे, असे सांगून जनसामान्यांच्या माथी थोपवल्या जातात. त्या गोष्टीत नक्की विज्ञान आहे का? हे वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या आधारे तपासता येते. विज्ञानाला आज सगळ्या गोष्टींची कारणे माहित नाहीत, पण ती कारणे वैज्ञानिक दृष्टिकोनांच्या आधारेच समजू शकतात. ७) आपल्या जीवनात आज जे जे काही घडते, त्यामागे पूर्व संचित आहे, नियती आहे, नशीब आहे, पूर्वजन्मीचे पाप आहे. असं समजणे हा पळपुटेपणा आहे. कष्टाला पर्याय नाही, हेच वैज्ञानिक दृष्टिकोन सांगतो. ८) वैज्ञानिक दृष्टिकोन आत्मसात करताना सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे छद्म विज्ञानापासून सावध राहिले पाहिजे. छद्म विज्ञानाचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे वास्तू शास्त्र, जोतिष शास्त्र आदी होत. ९) धर्माशिवाय माणसाच्या विवेकातून नीती निर्माण होऊ शकते, असे वैज्ञानिक दृष्टिकोन सांगतो. १०) आत्मा-परमात्मा, जन्म-मृत्यु, प्रारब्ध-संचित, नशीब-मोक्ष यांची मांडणी अनेक धर्मानी, अनेकांनी वेगवेगळ्या पद्धतीने केलेली आहे. व्यक्तिपरत्वे हा गोंधळ बदलू शकतो. वैज्ञानिक दृष्टिकोन तो सारा फसवेपणा नाकारतो. जो विज्ञानाच्या कसोटीवर टिकतो, तो तो खरा... असे वैज्ञानिक दृष्टिकोन स्पष्ट करते. पंडित नेहरू वैज्ञानिक दृष्टिकोनाचे महत्व सांगताना लोकसभेत म्हणाले होते- "सायंटिफिक टेंपरॅमेंट इज अ प्रोसेस ऑफ थिंकिंग, मेथड ऑफ ॲक्शन, सर्च ऑफ ट्रुथ, वे ऑफ लाईफ, स्पिरीट ऑफ फ्री मॅन."

भारतात दरवर्षी २८ फेब्रुवारीला राष्ट्रीय विज्ञान दिवस चंद्रशेखर वेंकट रामन यांच्या सन्मानार्थ साजरा केला जातो. विज्ञानाच्या फायद्यांबद्दल समाजात जागरूकता, वैज्ञानिक वृत्ती व वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी राष्ट्रीय विज्ञान, तंत्रज्ञान परिषद, विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयांतर्गत राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा केला जातो. याचाच हेवा आंतरराष्ट्रीय स्तरावर वाटू लागला. रामन इफेक्टचा शोध लागल्याने राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा केला जातो. या शोधाची घोषणा भारतीय शास्त्रज्ञ सर चंद्रशेखर वेंकटरामन यांनी २८ फेब्रुवारी १९२८ रोजी केली होती. या शोधाबद्दल त्यांना १९३०मध्ये नोबेल पारितोषिक देण्यात आले होते. सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ.वसंतराव गोवारीकर हे सन १९८७ साली भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान खात्याचे सचिव असताना त्यांनी ज्या अनेक योजना सुरू केल्या, त्यातील एक योजना म्हणजे देशात विज्ञानाचे वातावरण व दृष्टी निर्मितीसाठी राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा होऊ लागला. डॉ.वसंतराव गोवारीकरांच्या मनात आले, की भारतात विज्ञानाचा एकमेव नोबेल पुरस्कार डॉ.सी.व्ही.रामन यांना मिळाला आहे, तर त्यांच्याशी संबंधितच तो दिवस असावा. शिवाय तो त्यांचा जन्म अथवा मृत्युदिन निवडण्यापेक्षा त्यांनी ज्या दिवशी त्यांचा निबंध जगप्रसिद्ध नेचर या विज्ञान मासिकाला पाठवला आणि ज्याला पुढे १९३० साली नोबेल पुरस्कार मिळाला ती तारीख का निवडू नये? अखेर तीच तारीख निघाली. राष्ट्रीय आणि इतर विज्ञान प्रयोगशाळा, विज्ञान अकादमी, शाळा, महाविद्यालये आणि प्रशिक्षण संस्था यासारख्या सर्व विज्ञान संस्थांमध्ये या दिवशी विविध वैज्ञानिक उपक्रमांशी संबंधित कार्यक्रम आयोजित केले जातात. महत्त्वाच्या कार्यक्रमांमध्ये भाषणे, निबंध, शास्त्रज्ञांचे लेखन, विज्ञान प्रश्नमंजुषा, विज्ञान प्रदर्शन आणि परिसंवाद इत्यादींचा समावेश होतो. विज्ञान क्षेत्रातील विशेष योगदानासाठी राष्ट्रीय आणि इतर पुरस्कारही जाहीर केले जातात. विज्ञानाची लोकप्रियता वाढवण्यासाठी विशेष पुरस्कारही ठेवण्यात येतात.

विज्ञान दिनाची उद्दिष्टे- लोकांच्या दैनंदिन जीवनात वापरल्या जाणाऱ्या विज्ञानाचे महत्त्व सांगण्यासाठी विज्ञान दिन दरवर्षी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर साजरा केला जातो. मानवी कल्याणासाठी विज्ञान क्षेत्रात सर्व क्रियाकलाप, प्रयत्न आणि कृत्ये प्रदर्शित करणे. सर्व विषयांवर चर्चा करणे आणि विज्ञान क्षेत्रात विकास साधणे यांसाठी, नवीन तंत्रज्ञानाची अंमलबजावणी करण्यासाठी हे साजरे केले जाते. जगातील व देशांदेशातील वैज्ञानिक विचारांच्या नागरिकांना संधी देणे. लोकांना प्रोत्साहित करणे, विज्ञानाची दृष्टी बहाल करणे, तसेच विज्ञान आणि तंत्रज्ञान लोकप्रिय करणे आदी सांगता येतील. राष्ट्रीय विज्ञान दिनाचे मूळ उद्दिष्ट विद्यार्थ्यांना विज्ञानाकडे आकर्षित करणे, त्यांना प्रेरित करणे, विज्ञान आणि वैज्ञानिक कामगिरीबद्दल लोकांना जागृत करणे हा आहे. विज्ञानाशिवाय विकासाचा मार्ग वेगाने पुढे जाऊ शकत नाही. विज्ञान गैरसमज आणि अंधश्रद्धा नष्ट करते. विज्ञान आणि तंत्रज्ञान प्रसिद्ध करण्यासोबतच देशातील नागरिकांना या क्षेत्रात संधी देऊन नवीन उंची गाठणे, हा त्याचा मुख्य उद्देश आहे. देशाच्या विकासासाठी वैज्ञानिक विचारांचा प्रसार आवश्यक आहे. राष्ट्रीय विज्ञान दिनासारखे कार्यक्रम वैज्ञानिक वृत्तीचा प्रसार करण्यासाठी निश्चितच उपयुक्त ठरू शकतात. विज्ञानाच्या माध्यमातूनच आपण समाजातील लोकांचे जीवनमान अधिकाधिक सुखी करू शकतो.

विज्ञानाच्या फायद्यांबद्दल समाजात जागरूकता निर्माण करणे आणि वैज्ञानिक वृत्ती निर्माण करण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय विज्ञान दिन साजरे केले जातात, हे ध्यानी घ्यावे.

!! विश्व विज्ञान दिनाच्या सर्वांना सप्ताहभर हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

# दिवाळी अंक वाचकांना वैचारिक आनंद देऊन जातात




प्रमोद कुलकर्णी,
मुंबई

आधुनिक केसरी

**तमसो मा ज्योतिर्गमय अज्ञानाच्या अंधारातून ज्ञानाच्या प्रकाशाकडे नेणाऱ्या सण म्हणजे दिवाळी होय. दिवाळी म्हणजे आनंदाचा उत्सव. फराळ नवीन कपडे रोषणाई यासोबत वैचारिक समृद्धी करण्यासाठी दिवाळी अंक शिवाय दिवाळी पूर्ण होऊ शकत नाही .दिवाळी अंक सुशिक्षित व साहित्यप्रेमी घरामध्ये आनंद उत्सवासाठी तयार केलेली नियतकालिके होय .मनोरंजन जुन्या परंपरा, संस्कृती याचा अंतर्भाव दिवाळी अंकांमध्ये दिसून येतो. त्यामुळे दिवाळी अंकाची ओढ सर्वसामान्य घरातील सर्वांना असते. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासात महत्त्वाचे स्थान दिवाळी अंकला आहे, दिवाळी अंकाची सुरुवात मुळात साहित्यिक प्रेरणेतून झाली.**

पहिल्यांदा स्वतंत्र दिवाळी अंक इसवी सन 1909 मध्ये काशिनाथ रघुनाथ मित्र यांनी मनोरंजन या दिवाळी अंकांनी केली. त्याचा पांयडा अजून सुरू आहे हे वाचकांसाठी व साहित्यकांसाठी मोलाची बाब आहे .तत्कालीन घडामोडीची प्रतिबिंब दिवाळी अंकात दिसून येत असतात. मराठी वाचकांच्या रसिकतेचा जिवंतपणा यातून सिद्ध होत असतो. दिवाळी अंकामुळे सकस वाचनाचा आनंद द्विगणित होत असतो .मराठीमधील उत्तम साहित्य दिवाळी अंकात प्रसिद्ध होत असते. एखाद्या समाजाची संस्कृती मूल्य हे नेहमी भाषेतून व्यक्त होतात .भाषा व्यवहार जेवढा समृद्ध तेवढी संस्कृती समृद्ध होत असते. साहित्यिक, सांस्कृतिक रूपे दिवाळी अंकाच्या निमिताने समोर येते असतात. दिवाळी अंक हा वर्षभरातल्या उत्तम उत्तम साहित्याचे शिखर असते. साने गुरुजी यांनी सुद्धा साधना नावाचा दिवाळी अंक संपादित केला. दिवाळी अंकांमध्ये संपादकाची भूमिका फार मोलाची असते. काही दिवाळी अंक हे संपादकाच्या नावाने विकत घेतले जातात. संपादक हा क्रिएटिव्ह आर्टिस्ट असतो. त्यांना सध्याच्या वाचक वर्गाचा मानसिक विचार करून संपादन करावा लागतो. दिवाळी अंकाच्या मुखपृष्ठावरूनच दिवाळी अंकात काय वाचनाची मेजवानी ते दिसते. जेवढे मुखपृष्ठ मोहक असते तेवढेच वाचक त्याकडे आकर्षित होतो. संपादकाला चांगले लेखक शोधावे लागतात. त्यांच्याकडून वेळेत लेख मागून संपादित करावे लागतात. दिवाळी अंकातले कविता ,साहित्य ,लेख निवडताना संपादकाची खरी




कसोटी लागते. लेखकाचे मानधन दिवाळी अंकाची विक्रीतून होत असते .सध्याच्या वातावरणात साधारणतः 700 ते 800 च्या वर दिवाळी अंक निघतात. पण त्याच्या साहित्यिक दर्जा उच्च असतोच असे नाही .फारच मोजके दिवाळी अंक आहेत जे आवर्जून वाचले जातात .दिवाळी अंकामध्ये काळानुसार बदल होत आहेत. दिवाळी अंकाला सध्या बाजारुपणा आलेला आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. केवळ जाहिरातीतून मिळणाऱ्या उत्पादनावर डोळा ठेवून काही दिवाळी अंकाची निर्मिती होते .त्यातून वाचकांना सकस साहित्य वाचण्यास मिळत नाही .दिवाळी अंक विशेष विषयानुसार संपादित करत असताना या दिवाळी अंकाचे वेगळेच वैशिष्ट्य दिसत असते ..व्यंगचित्र ,साहित्य, कला ,संस्कृती ,वैद्यकीय ,विनोद महिलाविषयक ,राशी विषयक, आरोग्य विषयक ,क्रीडा विषयक, संगीत, चित्रपट विषयक , विविध दिवाळी अंक निघतात ते वाचकांसाठी मैफल ठरतात .त्यामुळे सर्व सामान्य वर्ग दिवाळी अंका करीत जास्त खर्च करत नाही .एक दोन दिवाळी अंक खरेदी करतो .त्यामुळे घरातील इतरांची वाचनाची भूक थंडावली जाते .त्यातून वाचक वर्ग कमी होतो .त्यामुळे एकाच दिवाळी अंकात सर्वसामाविष्ट असले तर अंक सर्वजण खरेदी करतात. संपादकाला दिवाळी अंकातून उत्पादनासाठी जाहिरातीची मदत घ्यावी लागते ही वस्तू स्थिती आहे .मनोरंजन कमी व जाहिराती जास्त असे सुद्धा दिवाळी अंक आहेत .काही संपादक फक्त जाहिरातीसाठी दिवाळी अंक काढतात की काय असे वाटते .त्यामुळे दिवाळी अंक विकत घेऊन वाचकांची संख्या घटत आहे. जाहिरातीचे वाढत जाणारे वर्चस्व त्यामुळे मूळ स्वरूप नाहीसे होत चालले याची भीती निर्माण झाली आहे. सोशल मीडियाचा कोरोनाच्या काळात विपुल प्रमाणात वापर सुरू झाला. व्हाट्सअप, फेसबुक यांचा वापर प्रमाणाच्या बाहेर वाढलेला आहे. काळानुसार डिजिटल दिवाळी अंक विपुल प्रमाणात निघताना दिसत आहेत. डिजिटल दिवाळी अंकाला खर्च कमी येतो पण वाचक वर्ग कमी होत आहे.

सोशल मीडियामुळे दिवाळी अंकाला वाचक वर्ग कमी झालेला आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही .मराठी भाषेच्या विकासासाठी भाषेमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून नवनवीन दर्जेदार साहित्य तयार करण्याचे प्रयत्न करत आहेत हे स्वागतार्ह आहे . छपाई दिवाळी अंक वापरण्यास जेवढी आतुरता असते तेवढी डिजिटल स्वरूपात वाचनात येत नाही. त्याला काही मर्यादा येतात दर्जेदार चांगले लेखन असेल तर वाचक वर्ग वाढतो पण लेखकाला मानधने पुरेसे मानधने पुरेसे नसल्यामुळे चांगले लेखक संपादक मिळणे अवघड जाते. बऱ्याच दिवाळी अंकाने स्वतःचे स्वरूप विशिष्ट अबाधित ठेवलेले आहे .वाचक वर्ग त्यां दिवाळी अंकाला प्राधान्य देऊन वाचन करत असताना दिसत आहेत. महाराष्ट्राची सांस्कृतिक साहित्यिक परंपरा जतन करण्यासाठी दिवाळी अंकाची परंपरा अबाधित करणे गरजेचे आहे.



# आध्यात्मिक गृरु विद्यावाचस्पती विद्यानंद यांचा थक्क करणारा जीवनप्रवास

आधुनिक केसरी

**स्वतःला सिद्ध करण्याची जिद्द उराशी बाळगून शैक्षणिक, व्यावसायिक, सामाजिक, आर्थिक, आध्यात्मिक अशा सर्वच क्षेत्रांत उल्लेखनीय पण अनाकलनीय यश प्राप्त करणारे आणि नशिबाने प्राप्त झालेली आर्थिक सुबत्तता, सधनता, कौटुंबिक पार्श्वभूमी आणि सामाजिक समृद्धी केवळ लोकनिंदेला कारण ठरत असल्याने घरदार सोडून अनेकविध आव्हाने लिलया पेलून अपार कष्टाने स्वत:च्या पायावर ठामपणे उभे राहून अनेक तरुणांना करिअर निवडीत मार्गदर्शन करणारे जेष्ठ पत्रकार, लेखक, साहित्यिक, व्याख्याते, स्तंभ लेखक, कवी, व्याख्याते, अभिनेते, मानसशास्त्रीय समुपदेशक आणि आध्यात्मिक गुरु विद्यावाचस्पती विद्यानंद नव्या पिढीसाठी जणू प्रेरणेचा स्त्रोत आहेत.**

मराठवाड्यामधील उस्मानाबाद जिल्ह्याच्या अंतर्गत असलेल्या परांडा तालुक्यातील चिंचपूर ह्या गावात कुलकर्णी कुटुंब वास्तव्याला होते. विद्यावाचस्पती विद्यानंद उर्फ डॉ. शैलेश कुलकर्णी ह्यांच्या आजोबांनी चिंचपूरमध्ये अनेक वर्षे शेती हेच उदरनिर्वाहाचे साधन निवडले होते. मराठवाड्यातील दुष्काळजन्य परिस्थितीचा सामना करणे कालांतराने त्यांना नकोसे झाले. विद्यावाचस्पती विद्यानंद यांच्या आजोबांनी शहरीभागात वास्तव्य करून पोटापाण्याचा प्रश्न सोडवण्याचा निर्णय घेतला. कुटुंबातील सर्वच सदस्यांना घेऊन ते काही काळ पुणे येथे आणि नंतर ठाण्यात वास्तव्य करू लागले. तीन पिढ्यांपासून आजही सुरु असलेल्या व्यवसायाची मोर्चेबांधणी विद्यावाचस्पती विद्यानंद ह्यांच्या वडिलांनी नंतरच्या काळात केली. बांधकामासाठी लागणारा सर्व प्रकारचा माल, साहित्य विक्री करण्याच्या व्यवसायात त्यांचा चांगला जम बसला. आजोबांच्या बरोबरीने त्यांच्या वडिलांनी अपार कष्ट करून तो व्यवसाय एका विशिष्ट उंचीवर नेला. सामाजिक प्रतिष्ठा, पैसा, संपत्ती, मानसन्मान हे अवघ्या एकाच दशकामध्ये प्राप्त झाले. त्यांच्या आजोबांनी आणि वडिलांनी प्रचंड कष्टाने उभारलेला कौटुंबिक व्यवसाय साधारणपणे तीन-चार वर्षे विद्यावाचस्पती विद्यानंद ह्यांनी देखील बघितला. परंतू त्यांचे मन त्यामध्ये फारसे रमले नाही. वडिलोपार्जित व्यवसायाला साजेसे शिक्षण घेतलेले असावे ह्या कुटुंबातील ज्येष्ठांच्या अपेक्षेप्रमाणे त्यांनी वाणिज्य शाखेतून मुंबई विद्यापीठातून पदवी संपादित केली, परंतू त्यांचा ओढा कलाक्षेत्राकडे अधिक होता. सिनेनाट्य क्षेत्राची आवड आणि आकर्षण अनेकांना असते तसे ते त्यांनाही होते. वयाच्या विसाव्या वर्षी त्यांना मॉडेलिंग करण्याची, व्यावसायिक रंगभूमीवर काम करण्याची संधी मिळाली. त्याचबरोबर त्यांना इंटेरिअर डेकोरेशन ह्या क्षेत्राचे देखील खूप आकर्षण, आवड आणि ओढा होता.


मुंबईमध्ये इंटेरिअर डिझाईनचा अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण करून त्यांनी ८० च्या दशकात स्वतःचा व्यवसाय मुंबईत सुरु केला. त्याच दरम्यान `नंदनवन' ह्या शीर्षकाखाली गृहसजावटीसंदर्भातील मराठीतील तेदेखील खास करून मध्यमवर्गीयांसाठी त्यांच्या मनावरील गृहसजावटीच्या खर्चाचे दडपण कमी करण्यासाठी पहिले पुस्तक लिहिले. सर्वसामान्यांना परवडेल आणि सौंदर्यापेक्षा उपयुक्ततेला प्राधान्य देऊन गृहसजावट करण्याबाबत त्यांनी लिहिलेले `नंदनवन' त्याकाळी खूप गाजले होते. त्या अनुषंगाने निरनिराळ्या साप्ताहिक आणि मासिकांमध्ये गृहसजावट ह्या विषयावर मराठीमध्ये शास्त्रशुद्ध आणि विस्तृतपणे लिहिणारे ते एकमेव लेखक असल्याने वाचकांच्या पसंतीस पडले. वाचकांच्या मनात घर करून स्वतःचे एक निराळे स्थान ते निर्माण करू शकले. त्याचा त्यांच्या व्यवसाय वृद्धीसाठी खूप उपयोग होऊ शकला. सुसमृद्ध कौटुंबिक पार्श्वभूमी असलेल्या विद्यावाचस्पती विद्यानंद यांना दरम्यानच्या काळात लोकनिंदेला सामोरे जावे लागले. परंतू त्या लोकनिंदेकडे सकारात्मकरीत्या बघत त्यांनी लोकनिंदेवर मात करत स्वतःला सिद्ध करण्यासाठी ठाण्यातील घर सोडून शैक्षणिक आणि व्यावसायिक पातळीवर अनेकविध आव्हानांना जिद्दीने कवटाळले आणि त्यात उल्लेखनीय, अविश्वसनीय आणि अनाकलनीय यशोशिखरे गाठली. २२ जुलै १९८५ रोजी ते आई-वडिलांचे आशीर्वाद आणि अवघे ७५० रुपये घेऊन महाराष्ट्राची सांस्कृतिक, शैक्षणिक राजधानी असलेल्या पुणे शहरात स्थलांतरित झाले. पुणे तसे त्यांच्यासाठी नवीनच होते, अनोळखी लोकांबरोबर नातं निर्माण करण्याची कला त्यांच्याकडे अवगत असल्याने त्यांना स्थायिक होण्यासाठी आणि स्वतःला पुण्याचा स्थानिक म्हणवण्यासाठी फारसा प्रयास करावा लागला नाही.

विद्यावाचस्पती विद्यानंद ह्यांनी वाणिज्य, इंटेरिअर डिझाईन, फॅशन डिझाईन, ॲनिमेशन, राज्यशास्त्र, मानसशास्त्र, व्यवस्थापन, पत्रकारिता, स्थापत्य शास्त्र, अग्निसुरक्षा, अभिनय, कला दिग्दर्शन, बँकिंग व फायनान्स, सुरक्षाव्यवस्था, अर्थशास्त्र, मराठी आणि अध्यात्म इत्यादी विषयांतील ३५ प्रकारचे नामवंत विद्यापीठांतून पदविका, पदवी आणि पदव्योत्तर अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केले आहेत. त्यांनी मानसशास्त्र या विषयात तसेच मलेशिया येथील लिंकन विद्यापीठातून पत्रकरितेतील व्यवस्थापनशास्त्र ह्या विषयातील डॉक्टरेटही मिळविली असून सद्यस्थितीत ते आध्यात्मातील त्यांच्या तिसऱ्या पी. एच. डी. ची तयारी करत आहेत. त्यांच्या लेखन संग्रहात एकूण पंचवीस ग्रंथ प्रकाशित झाले असून `अंतर्मनाचा आरसा' हे गृहसजावटीसंदर्भातील, `सुख-वस्तू' ही कादंबरी,



`काव्य सु-मने' आणि `मनामनांत' हे काव्यसंग्रह तर `विनोदी कथा डॉट कॉम' हा कथा संग्रह त्यांनी लिहिला आहे, त्याचप्रमाणे समाधानातील सुख, सुखाचे चांदणे, बाबासाहेबांची पत्रकारिता, भगवान बुद्ध ह्यांची आध्यात्मिक शिकवण, उणिवांची जाणीव इत्यादी अनेक ग्रंथ त्यांचे प्रकाशित झाले आहेत. त्यांच्या लेखनशैलीने प्रत्येक क्षेत्रातील वाचंकाना त्यांनी गेल्या दोन दशकांत आपलेसे केले आहे.

त्यांच्या आवडीच्या आणि अनेकांच्या जिव्हाळ्याच्या गृहसजावट विषयावरील सहा इंग्रजी पुस्तकांची इंटेरिअर डिझाईनच्या विद्यापीठीय अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे. आजवर गृहसजावट, समुपदेशन, मानसशास्त्र, करिअर मार्गदर्शन, सामाजिक, आर्थिक गुंतवणूक, आध्यात्मिक अशा अनेक विषयांवर त्यांनी विविध नियतकालिकांसाठी दोन हजारहून अधिक लेखांचे योगदान दिले आहे. गेल्या २५ वर्षांपासून ते अनेक वृत्तपत्रांसाठी वैविध्यपूर्ण विषयांवर स्तंभलेखन करत आहेत.



संजय व्यापारी
संपर्क क्र. 7743918559

व्यक्तिमत्वातील अभिनयाचे गुण आणि फिल्म इन्स्टीटयूट मधील शिक्षण घेतलेले असल्याने विद्यावाचस्पती विद्यानंद यांनी ज्येष्ठ-श्रेष्ठ अभिनेते स्व. श्रीराम लागू यांच्यासमवेत `किरवंत' या नाटकातही काम केले होते. सुरुवातीच्या काळांत त्यांनी मुंबईमध्ये विविध जाहिरातींसाठी मॉडेलिंगही केले. त्यांनी मराठवाडा मित्र मंडळ, महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, महावीर प्रतिष्ठान, करिअर पॉलिटेक्निक, सूर्यदत्त इन्स्टिट्युट अशा अनेक शैक्षणिक संस्थांमधून प्राध्यापक, प्राचार्य आणि संचालकपदी योगदान दिले असून इंटेरिअर डिझाईन, फॅशन डिझाईन, ॲनिमेशन, मिडिया, फिल्म मेकिंग, अभिनय, पत्रकारिता, अध्यात्म, अर्थशास्त्र, व्यवस्थापनशास्त्र अशा अनेकविध विभागाचे अध्यापनाचे कार्य केले आहे.

गेल्या दोन दशकांपासून सकारात्मक वैचारिक मंथनातून जगण्यापलीकडच्या जीवनाची अनुभूती प्राप्त करण्याचा कानमंत्र देणारी, मानसशास्त्रीय पातळीवरील आध्यात्माची जोड असलेली, विविध वयोगटासाठी तब्बल १४०० हून अधिक व्याख्याने विद्यावाचस्पती विद्यानंद यांनी आजवर दिली आहेत. त्यांनी १९९४ मध्ये पुणे विद्यापीठात वृत्तपत्रविद्येचा अभ्यासक्रम करून मुक्त पत्रकार म्हणून सकारात्मक पत्रकारितेची सुरुवात केली. प्रत्येक घडोमोडी, घटना सकारात्मक रीतीने वाचकांपर्यंत पोहोचवण्याचे काम त्यांनी केले. त्यासाठी प्रत्येक नकारात्मक घटनेला सकारात्मकरीत्या शाब्दिक खेळातून मांडण्याचे कौशल्य त्यांनी आत्मसात केले, त्यांची ही कारकीर्द थक्क करणारी आहे. अनेक नवोदित पत्रकारांना, त्यांच्या विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. आपल्या अनुभवाचा इतरांना लाभ व्हावा यासाठी ते सेवाभावी वृत्तीतून विविध विषयांवर कार्यशाळांचे आयोजन करत असतात. त्यामध्ये उद्योगाला चालना मिळण्यासाठी नवीन व्यावसायिकांसाठी, गृहसजावट, लेखन कौशल्य, संवाद कौशल्य, काव्यलेखन, सोशल मिडीयावरील जाहिरात व्यवस्थापन, पत्रकारिता, मानसशास्त्रीय समुपदेशन, सकारात्मक विचार कौशल्य, शैक्षणिक यशप्राप्ती, अध्यात्म, मानसिक तणाव व्यवस्थापन इत्यादी अनेक विषयांचा समावेश असतो. जगण्यापलीकडचे जीवन अनुभवण्याचा, समाजातील प्रत्येक घटकाकडे पाहण्याचा दृष्टिकोन सतत सकारात्मक व्हावा यासाठीही ते सातत्याने निरनिराळ्या पद्धतीने मार्गदर्शन करत असतात. सतत नकारात्मक घटनांना सामोरे जाणाऱ्या पोलिस प्रशासनातील अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या विचार, वर्तन आणि व्यवहारात सकारात्मकता पेरण्यासाठी ते व्याख्यानाच्या, प्रशिक्षणाच्या माध्यमातून योगदान देत आहेत. आतापर्यंत राज्यभरात २०० पेक्षा अधिक कार्यक्रमातून अनेक पोलिस कर्मचाऱ्यांना, अधिकाऱ्यांना त्यांनी प्रेरित केले आहे. शालेय विद्यार्थ्यांसाठी "व्हा यशवंत-कीर्तिवंत" ह्या शीर्षकाखाली व्याख्यानांद्वारे सकारात्मक वैचारिक मंथनातून यशप्राप्तीच्या योग्य मार्गाचे दर्शन घडवून आणत आहेत.

श्री सद्गुरू दत्त संप्रदायाशी जोडले गेलेल्या विद्यावाचस्पती विद्यानंद ह्यांचा आध्यात्मिक प्रवास देखील थक्क करणारा आहे. त्यांच्या संपर्कात येणाऱ्या प्रत्येकाला आध्यात्मिक पातळीवर मार्गदर्शन करून त्यांना सकारात्मक वैचारिक मंथानाच्या माध्यमातून यशप्राप्तीच्या योग्य मार्गाचे दर्शन घडवतात. श्री सद्गुरू दत्त संप्रदायाची गुरु-शिष्य परंपरा पुढे चालू ठेवण्याचा आशीर्वाद, आदेश आणि अधिकार त्यांना त्यांच्या श्रीगुरू पिठाकडून प्राप्त झाला असून त्याच कार्यात त्यांनी त्यांचे जीवन समर्पित करण्याचा संकल्प सोडला आहे. ह्याच कारणामुळे त्यांना नुकतेच "धर्मरत्न" ह्या राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. आज पर्यंत त्यांना अनेक स्थानिक, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

गेल्या ३५ वर्षांत चरितार्थासाठी स्वबळावर उद्योग-व्यवसायातील अनेक वैविध्यपूर्ण प्रकल्प त्यांनी यशस्वी करून दाखविले. निरनिराळ्या क्षेत्राशी त्यानिमित्ताने संपर्क आल्यामुळे गाठीशी असलेला गाढा अनुभव प्राप्त झाल्यामुळे त्यांच्या आयुष्यात कधीही साचलेपण आलेच नाही. त्यांनी सातत्याने नाविन्यता, सर्जनशीलता, सजगता, सहनशीलता आणि कल्पकतेचा त्यांच्या सौदर्यदृष्टीने शोध घेतला. "भिंतीवरील कालगणनेच्या दिनदर्शिकेत असलेली प्रत्येक दिवसातील वैविध्यपूर्णता आपल्या स्वतःच्या जीवनाशी जोडण्याचा ध्यास त्यांनी कायम ठेवला. त्यामुळे प्रत्येकाने आपापल्या जीवनात प्रत्येक दिवशी नाविन्यतेचा ध्यास घ्यायला हवा आणि हा ध्यास आपला श्वास व्हायला हवा. एवढे झाल्यावर अंतर्मन आनंदी होत राहते आणि जगात कुठेही न मिळणारा आनंद आपल्या वाट्याला येतो'', असे ते निक्षून सांगतात. आयुष्यात सतत सकारात्मक विचार, वर्तन आणि व्यवहार करत त्यात यश मिळविणाऱ्या विद्यावाचस्पती विद्यानंद यांना आज त्यांच्या जन्मदिनी मानाचा मुजरा आणि त्यांच्या पुढील आध्यात्मिक जीवनप्रवासासाठी मनापासून शुभेच्छा....!

## अल्प परिचय



- **नाव :** विद्यावाचस्पती विद्यानंद उर्फ प्रा. डॉ. शैलेश कुलकर्णी
- **जन्मभूमी :** ठाणे, **कर्मभूमी :** पुणे , **जन्म दिनांक :** १० नोव्हेंबर
- **कार्यक्षेत्रे :** सकारात्मक वैचारिक मंथन घडवून आणणारी अनेकविध कार्यक्षेत्रे
- **आवड / छंद :** लेखन, शाब्दिक खेळ खेळून सकारात्मक वातावरण निर्माण करणं, व्यक्तिवाचन, पुस्तक वाचन, फोटोग्राफी, ड्रॉइंग्ज करणं, व्यावसायिक अभिनय, व्यावसायिक दिग्दर्शन करणं, शिक्षणाचा ध्यास, योगा-ध्यान, अध्यात्म, वैचारिक बैठकीत सहभागी होणं, इंटेरिअर डिझायनिंग, सकारात्मक पत्रकारिता करणे, न्यूजपेक्षा ( news ) व्ह्यूजला ( Views ) अधिक प्राधान्य आणि महत्व देणं, अभ्यास सहलीची संधी मिळवणं, सामाजिक ते राजकीय विषयांवरील सकारात्मक चर्चेत सहभागी होणं, विद्यार्थी आणि उद्योजक ह्यांच्यासाठी प्रेरणादायक व्याख्यान देणं, थोडक्यात भिंतीवरील कॅलेंडर प्रमाणे प्रत्येक दिवस वैविध्यपूर्ण करणं, अनुभवणं, आनंद निर्मिती करणं ( कारण आनंद निर्माण करून तो वाटण्यावर जी. एस. टी. शून्य टक्के आहे )
- **शैक्षणिक प्रवास :** वरीलपैकी निरनिराळ्या विद्याशाखांमध्ये आणि वैविध्यपूर्ण विषयात शिक्षण घेतलं असून एकूण ३५ अभ्यासक्रम विविध विद्यापीठाच्या माध्यमातून यशस्वीरीत्या पूर्ण केले आहेत. ज्यामध्ये पदविका, पदव्योत्तर पदविका, पदवी आणि पदव्योत्तर पदवी यांचा समावेश असून मानसशास्त्र विषयात पहिली पी. एच. डी. आणि पत्रकारितेतील व्यवस्थापन ह्या विषयातील दुसरी पी. एच. डी. प्राप्त झाली आहे. सद्यःस्थितीत मूल्य आणि अध्यात्म ह्या विषयातील तिसऱ्या पी. एच. डी. चे संशोधन कार्य सुरु आहे.
- **आध्यात्मिक प्रवास :** वयाच्या चौथ्या महिन्यात बेळगावच्या प. पू. कलावती आईंच्या मांडीवर निजून त्यांच्या तोंडून भजनसेवेत सहभागी होता आले, त्यांचेव्दारा बोधामृत प्राशन करायला मिळाले. कुटुंबात आजोबा दत्तात्रेय आणि पणजोबा भगवंत हे दोघेही दिवसरात्र श्रीसद्गुरु दत्तसेवेत असत. सन १९८६मध्ये पुण्यात आल्यावर श्रीदत्तगुरूंचा श्रीनृसिंह सरस्वती रूपातील दृष्टांत झाला, नंतर साक्षात्कार झाला. सन १९९९ मध्ये कोल्हापूर येथे श्रीसद्गुरूंच्या दर्शनसेवेचा लाभ प्राप्त झाला. कालांतराने श्रीसद्गुरूंच्या कृपाशीर्वादामुळे जीवन धन्य झाले. मूल्य आणि आध्यात्मिक शिक्षण ह्या विषयाचा विद्यापीठाचा पदविका, पदव्योत्तर पदविका, पदवी आणि पदव्योत्तर पदवी अभ्यास यशस्वीरीत्या पूर्ण करून सद्यःस्थितीमध्ये अध्यात्म हा विषय घेऊन तिसऱ्या पी. एच. डी. चे संशोधन कार्य सुरु आहे. रोज सायंकाळी ७.०० ते दुसऱ्या दिवशी सकाळी ११.०० पर्यंत एकूण सोळा तासांचे मौनात राहून श्रीसद्गुरुंच्या आशिर्वादाने आध्यात्मिक साधना, ध्यान-धारणा, जप-तप अशाप्रकारे आध्यात्मिक अनुभूतींची प्रचिती प्राप्त करणे सुरु असते.
- **ग्रंथ लेखन :** विविध विषयांवरील एकूण २५ ग्रंथांचे स्वतंत्र लेखन हातून झाले असून त्यापैकी ६ ग्रंथ विद्यापीठात क्रमिक पाठ्यक्रमासाठी समाविष्ट करण्यात आले आहेत. विविध विषयांवरील सुमारे २००० पेक्षा अधिक लेख वृत्तपत्रातून स्तंभ लेखांच्या माध्यमातून गेल्या २५ वर्षांमध्ये प्रसिध्द झालेले आहेत.
- **कार्यानुभव :** सलग ३० वर्षे अध्यापन करून शिक्षण क्षेत्रांत भरीव योगदान दिले. त्या दरम्यान विविध महाविद्यालयात प्राध्यापक, प्राचार्य, संचालक म्हणून शिक्षण क्षेत्रातील योगदान दिले गेले.
- **व्यावसायिक सहभाग :** समांतरपणे एकूण ६ क्षेत्रात ३५ वर्षे उल्लेखनीय कार्य. सद्यःस्थितीत "Live 24 News मराठी" ह्या न्यूज चॅनेलसाठी चीफ न्यूज एडिटर म्हणून तसेच शैक्षणिक संस्थांची उभारणी करून त्या चालविण्यासाठी मार्गदर्शन करणे चालू आहे.
- **सन्मान, सत्कार :** राष्ट्रीय पातळीवरील "धर्मरत्न" पुरस्काराने नुकतेच गौरविण्यात आले. ह्या व्यतिरिक्त अनेक राष्ट्रीय तसेच काही आंतराष्ट्रीय पुरस्कारही निरनिराळ्या कारणांमुळे आतापर्यंत प्राप्त झाले आहेत.
- **व्यासंग :** लेखणीचा तसेच वाणीचा उपयोग करुन प्रसारमाध्यमे आणि जनसंपर्काव्दारे सकारात्मक वैचारिक मंथन घडवून आणणे.
- **एकूणसंपत्ती :** श्रीसद्गुरुकृपाशिर्वाद, श्रीसद्गुरुंचे श्रीचरण, आपल्यासारख्यांशी जोडलेलं रक्तापलीकडचं नातं हीच माझी संपत्ती, कधीही न संपणारी.....
- **संपर्कासाठी भ्रमणध्वनी :** +917709612655 ( वेळ : सकाळी ११.३० ते सायंकाळी ६.०० पर्यंतच )









# लोणार सरोवराच्या बाजूचे प्रभू श्रीरामाचे मंदिर

आधुनिक केसरी

**लोणार सरोवराच्या पाण्यापाशी जाताना उंचावरून एका पायवाटेने खाली उतरत यावं लागतं... हा रस्ता नागमोडी वळणाचा आणि जंगलातून जाणारा आहे...याचं पायवाटेवर जरासं आडवाटने बाजूला काही अंतर चालतं गेलं की डाव्या बाजूला थोडंसं उंचावर हे एक अदभूत आणि खास वैशिष्ट्यपूर्ण असे श्रीरामाचे मंदिर आहे... मोडतोड आणि अत्यंत दुर्लक्षित झालेलं हे मंदिर अजूनही त्याच्या पुराणकालीन वैभवशाली श्रीमंतीची साक्ष देत उभे आहे... या मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे या मंदिरात फक्त श्रीरामाची मूर्ती आहे, सहसा श्रीराम यांची एकटी मूर्ती कधीही नसते... श्रीरामाच्या एका बाजूला बंधू लक्ष्मण आणि दुसऱ्या बाजूला पत्नी सीता उभे असतात...अजून खास म्हणजे श्रीराम यांची ही मूर्ती निशस्त्र अवस्थेत आहे आणि हे ही वैशिष्ट्यपूर्ण आहे...श्रीरामाच्या हातात कायम धनुष्यबाण दाखवले जाते जे या मूर्तीत नाही...**

यामागे एक खास कारण आहे...श्रीराम वनवासात असताना येथे या सरोवराच्या बाजूला वास्तव्यास असताना त्यांचे वडील दशरथ यांचे निधन झाले... श्रीरामांनी आपल्या वडिलांचा दशक्रियाविधी येथून वीस किमी अंतरावर असलेल्या पैनगंगा नदीच्या काठी मेहकर येथे केला...तेथेच श्री बालाजी यांची खास मूर्ती आहे त्यावर मागच्या भागात लिहिले आहेच...

श्रीराम यांना आपल्या वडीलांचे पिंडदान करायचे होते आणि ते वनवासात असल्याने त्यासाठी अट अशी होती त्या विधीसाठी श्रीराम निशस्त्र असायला हवेत आणि त्यांच्याबरोबर कोणी स्वकीय असायला नको...हेच पिंडदान श्रीरामांनी या सरोवराच्या बाजूला केले आणि त्याचं ठिकाणी सध्याचे हे निशस्त्र श्रीरामाचे मंदिर आहे...





या मंदिरात एक अचंबित करणारी गोष्ट अशी या ठिकाणी तुम्ही गाभाऱ्यात मूर्तीच्या समोर उभे राहून हात जोडून नमस्कार करायला उभे राहिलात की तुम्हाला श्रीरामांच्या मूर्तीच्या एका बाजुला लक्ष्मण आणि दुसऱ्या बाजूला सीता मातेचे दर्शन होते...हे खूपच आश्चर्यकारक आहे... त्यामागे एक खास कारण आहे...या मंदिरात सभामंडपात दगडी सुबक नक्षीकाम केलेले बारा खांब आहेत, जे एका विशिष्ट रचनेत मंदिरात बसवले गेले आहेत...चार मोठे खांब सभामंडपात मध्यभागी आणि चार छोटे खांब उजव्या बाजूला आणि चार डाव्या बाजूला...हे खांब अशा रितीने बसवले गेले आहेत की ज्यावेळी आपण मूर्ती समोर हात जोडून उभे असतो त्यावेळी प्रकाशाची किरणे विशिष्ट कोनातून परावर्तित होईन आपली स्वतःची सावली श्रीरामाच्या मूर्तीच्या बाजूला अशा प्रकारे पडते की आपल्याला त्या मूर्तीच्या एका बाजूला सीतामाता आणि दुसऱ्या बाजूला लक्ष्मण उभे आहेत हा भास निर्माण होतो...मी हे प्रत्यक्ष बघितल्यावर अंगावर रोमांच उभे राहिले...जरा विचार करा त्यावेळी आजच्या सारखे कॅलक्युलेटर , संगणक, दुर्बीण, होकायंत्र असे कोणतेही अद्ययावत साधन सामुग्री उपलब्ध नसताना हे त्यांनी कसे निर्माण केले असेल ?...अहो एक दोन सेंटीमीटर जरी खांबांची लांबी, रुंदी, ठेवण बदलली तरी ही विस्मयकारी गोष्ट साकारणे केवळ अशक्य आहे...यावरून त्याकाळी विज्ञान किती प्रचंड ताकदीचे होते याची प्रचिती येते...

एवढंच नाही तर या मूर्तीच्या समोर उभे राहून तुम्ही आपले दोन्ही हात डोक्यावर सरळ उभे नेऊन डावीकडे उजवीकडे बाय बाय केल्यासारखे हलवले तर श्रीरामांच्या मस्तकाच्या वर मागच्या भिंतीवर या आपल्या हातांच्या सात सात सावल्या पंखा घालत असल्यासारख्या हलताना दिसतात... हे दोन्ही प्रकार मी स्वतः प्रत्यक्ष अनुभवल्यावर माझ्या अंगावर अक्षरशः काटा उभा राहिला... असे अजूनही खास वैशिष्ट्य या मंदिरात आढळले... यावरून जरा विचार करा की आपले पूर्वज किती विद्वान आणि प्रचंड कलात्मक होते...त्यावेळेसची पाषाण शिल्पकला किती अफाट होती... आपण कल्पनाही करू शकत नाही इतकं हे भव्यदिव्य आहे, पण काळाच्या ओघात अक्षरशः नेस्तनाबूत होत आहे...

अरे हो अजून एक खास बाब अशी या मंदिरात होकायंत्र काम करत नाही...तिथे मंदिरात विश्रांतीसाठी खाली जमिनीवर बसलो असताना होकायंत्र काढून वेगवेगळ्या दगडावर ठेऊन पाहिलं तर त्या होकायंत्राची सुई दक्षिण उत्तर दाखवत नाही...वेगवेगळ्या दगडावर होकायंत्र ठेवलं की ती सुई भरकटत जाते पण स्थिर दक्षिण उत्तर होत नाही...आहे की गमतीशीर ?... अर्थात यामागे शास्त्रीय कारण आहे...

या मंदिराची सध्याची अवस्था पाहून मन विषण्ण झालं... इतकं मोठं वैभव आपल्याकडे आहे याचा खरोखरचं अभिमान वाटतो...

कुलकर्ण्यांचा " रामभक्त " प्रशांत

तळटीप - मागे मी जर्मनीत असताना न्यूरेमबर्ग शहरात भटकायला गेलो होतो त्यावेळी त्या शहरात खास बघण्यासारखे वैशिष्ट्यपूर्ण काय आहे ? ही चौकशी मी तिथल्या स्थानिक पर्यटन कार्यालयात केली तेंव्हा तिथल्या बाईने मला एक नकाशा देत त्यांच्याकडे एक जुना किल्ला आहे आणि तो किती खास आहे हे रंगवून रंगवून सांगितलं आणि मी तेथे जाऊन तो बघावा असा खूप आग्रह केला... तिनं केलेले वर्णन ऐकून माझी उत्सुकता वाढली आणि मी गेलोही...तुम्हाला सांगतो तो किल्ला इतका साधा होता की आपल्या पुण्यातील पर्वती देखील लाख पटीने सुंदर आहे... आपल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात कदाचित त्यावेळची मुलं दिवाळीत असे किल्ले सहज बनवत असतील... खरंतर तर तो किल्ला नव्हताचं एक छोटीशी गढी होती...तो खूप जुना होता आणि त्याला इतिहासही होता...त्यांनी तो इतकासा किल्ला इतका माहितीपूर्ण, नीटनेटका आणि टापटीप ठेवला होता की विचारु नका... हे रामाचे मंदिर जर चुकून तिथे असते तर जरा विचार करा त्यांनी त्याचे काहीच्या काही करून ठेवले असते...या एका मंदिराच्या पर्यटनावर कैक लोकांचा उदरनिर्वाह सुरू राहिला असता इतकं त्यांनी ते जपलं असतं आणि त्याचा प्रचार प्रसार केला असता...

# भागवत धर्माची पताका संपूर्ण देशात फडकविणारे संत नामदेव

आधुनिक केसरी

महाराष्ट्र ही संतांची भूमी व संतांचे श्रध्दास्थान पंढरीचा विठोबा. ज्यावेळी जातीभेद, उच्चनीच, गरीब-श्रीमंत यांची मोठी भिंत समाजात उभी होती त्यावेळी विविध जातीत जन्माला आलेल्या संतांनी ही विषमतेची भिंत पाडण्याचे मोठे काम केले. यामध्ये संत नामदेवांनी महाराष्ट्र पुरते कार्य न करता भागवत धर्माचा प्रचार करण्यासाठी हिमालय ते कन्याकुमारी प्रवास केला. यावेळी त्यांना पंजाबच्या सरहद्दीमधून परकीय राजांची अतिक्रमणे होत असल्याची जाणीव झाली. ही अतिक्रमणे थोपविण्यासाठी, माणूस धर्म व भेदभाव घालविणे ही शिकवण देण्यासाठी संत नामदेवांनी तब्बल 12 वर्षे पंजाबच्या घुमानला मुक्काम ठोकला. या 12 वर्षात त्यांनी एवढे सामाजिक व धार्मिक कार्य केले की, आजदेखील पंजाबच्या हृदयात संत नामदेवांना स्थान आहे. यामुळेच शिखांच्या ग्रंथसाहिबामध्ये नामदेवांचे 61 अभंग आहेत. घुमान हे अमृतसरपासून 35 कि.मी. अंतरावरील गुरदासपूर जिल्ह्यातील छोटेसे गाव आहे. येथे संत नामदेवांच्या विविध कथा सांगणारे चार भव्य गुरूद्वारा आहेत. यापैकी एक बाबा नामदेवजी का समाधी मंदिर आहे. येथे संगमरवरी समाधी असून एक पलंग ठेवण्यात आला आहे. नामदेव अजूनही येथे विश्रंती घेत आहेत, अशी येथील भाविकांची श्रध्दा असल्यामुळे आत कोणास बोलू दिले जात नाही. तसेच एका सोनच्या पत्रावर नामदेवांची मूर्ती कोरण्यात आली आहे. दुसरा तपिया नामिया गुरद्वारा असून येथे महाराज तपश्चर्येला बसत होते. येथे नामदेवांची पाच फुटाची संगमरवरी मूर्ती आहे. येथील गुरूद्वारातील तलावात स्नान केल्यावर त्वचारोग जातात असा अनुभव भक्त सांगतात. संत नामदेव तपश्चर्या केल्यावर एका खडकावर बसत. तेथे चरण नामिया गुरूद्वारा आहे. तर खुंडी साहब नामिया गुरूद्वारा संत नामदेवांनी केलेल्या चमत्काराची साक्ष आहे. संत नामदेवांनी या परिसरात अनेक चमत्कार केले. त्यांची कीर्ती ऐकून एक भक्त आला व महाराजांना काहीतरी चमत्कार करा म्हणून मागे लागला. शेवटी नामदेवांनी त्याच हातातील वाळलेल्या काठीला हात लावला आणि त्याला तत्काळ पालवी फुटली. हाच तो खुंडी गुरूद्वारा. यासह घुमान येथेच नामिया कोठी आहे. येथील शेतकरी आपल्या आर्थिक शक्तीप्रमाणे अन्नदानासाठी येथे धान्य देतात. दुसरे विशेष म्हणजे या परिसरात लग्न झालेले जोडपे प्रथम दर्शनासाठी या कोठीवर आणले जाते. या चारही गुरूद्वारांमध्ये बाराही महिने अन्नदान सुरू असते. वसंत पंचमी येथे घुमानला मोठी यात्रा भरते. आपल्या राज्यातील हा मोठा संत पंजाबच्या मनावर राज्य करतो. यामुळेच अमृतसर, चंदीगड, जालंदर येथे त्यांच्या नावाने भवन, चौक उभारले आहेत. यावरून पंजाबने संत नामदेवांवर महाराष्ट्रापेक्षा अधिक प्रेम केल्याची खात्री पटते. यामुळे साहित्य संमेलनास येणारा प्रत्येक व्यक्ती आमच्यासाठी पूजनीय असल्याचे त्यांनी जाहीर केले आहे. हा वेगळा अनुभव यंदा साहित्यिकांच्या गाठीशी राहणार आहे.



# न्या. चपळगावकर साहित्य संमेलनाचे नवे अध्यक्ष



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**विदर्भ साहित्य संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त वर्धा येथे आयोजित केल्या जाणाऱ्या ९६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी माजी न्यायमूर्ती व जेष्ठ साहित्यिक न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर यांची निवड झाली आहे. ३, ४ आणि ५ फेब्रुवारी २०२३ रोजी हे संमेलन होणार असून या संमेलनाच्या अध्यक्षपदी न्यायमूर्ती चपळगावकर यांची निवड झाल्याने साहित्यिक समाधान व्यक्त करीत आहेत.**

वास्तविक न्यायमूर्ती चपळगावकर यांना याआधीच हा सन्मान मिळायला हवा होता मात्र आपल्याकडे जी पूर्वीपार चालू असलेल्या परंपरेप्रमाणे जेष्ठ साहित्यिकांनाच हा मान दिला जातो त्याप्रमाणे त्यांच्या जेष्ठत्वाचा मान राखून हा सन्मान दिला असला तरी हा सन्मान त्यांना याआधी मिळाला हवा होता तसे झाले असते तर संमेलनाध्यक्ष म्हणून मराठी साहित्याला पुढे नेण्यात त्यांना आणखी काम करता आले असते. अर्थात उशिरा का होईना त्यांना हा सन्मान दिल्या बद्दल साहित्य महामंडळाचे आभारच मानावे लागेल. न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर हे मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे माजी न्यायमूर्ती असून निवृत्ती नंतर त्यांनी अनेक विषयांवर विपुल लेखन करून साहित्य विश्वात स्वतः विषयी आदराचे स्थान मिळवले आहे. न्यायमूर्ती चपळगावकर वकिली व्यवसाय करण्याअगोदर मराठी व कायदा विषयाचे अध्यापक होते. त्यांनी जवळपास २७ वर्ष वकिली केली त्यानंतर ते मुंबई उच्च न्यायालयाचे नऊ वर्ष न्यायमूर्ती होते. निवृत्तीनंतर ते वृत्तपत्रात स्तंभलेखन करू लागले. महाराष्ट्राच्या अनेक वृत्तपत्रात त्यांचे कायदा विषयक स्तंभलेखन प्रसिद्ध होऊ लागले. याशिवाय त्यांची ललित, भाषाविषयक, समीक्षा, न्याय विषयक कथा, व्यक्ती चित्रण प्रसिद्ध झाले आहे. त्यांनी लिहिलेले अनंत भालेराव, काळ आणि कर्तृत्व, आठवणीतील दिवस, कर्मयोग संन्यासी, कायदा आणि माणूस, कहाणी हैद्राबाद लढ्याची, तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ, तुमच्या माझ्या मनातलं ( ललित ) त्यांना समजून घेताना, ( ललित ) दीपमाळ, नामदार गोखल्यांच्या भारत सेवक समाज, नामदार गोखल्यांचे शहाणपण, न्यायमूर्ती केशवराव कोरटकर, न्यायाच्या गोष्टी, मनातली माणसं, महात्मा गांधी आणि भारतीय राज्यघटना, राज्यघटनेचे अर्धशतक, विधिमंडळ आणि न्यायसंस्था संघर्षाचे सहजीवन, संघर्ष आणि शहाणपण, समाज आणि संस्कृती, संस्थांनी माणसं, सावलीचा शोध, हरवलेले स्नेहबंध ही त्यांनी लिहिलेली पुस्तके खूप गाजली आहे. न्यायमूर्ती चपळगावकर यांची ललित आणि कायदा विषयक पुस्तके वाचण्यासाठी वाचकांची झुंबड उडायची. न्यायमूर्ती चपळगावकर यांची माजलगाव येथे २००५ साली भरलेल्या २६ व्या मराठवाडा साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदी निवड झाली होती. मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद, राजवाडे संशोधन मंडळ, धुळे, कुसुमाग्रज प्रतिष्ठान, नाशिक प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई अशा अनेक संस्थांची त्यांनी मानाची पदं भूषवली आहेत. न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर यांना अनेक मानाच्या पुरस्काराने गौरविण्यात देखील आले आहे. आता अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी त्यांची निवड करून साहित्य महामंडळाने त्याच्या खऱ्या अर्थाने गौरव केला आहे. न्यायमूर्ती चपळगावकर यांची अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचे मनापासून अभिनंदन!



# लाचप्रकरणी शिक्षा होण्याचे प्रमाण कमीच!



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**सरकारी बाबू आणि लाचप्रकरण असे काही एकमेकाला चिकटले आहेत की, ते फेव्हिकॉलचे जोड आहेत, तुटता तुटत नाहीत. तुटणार तर कसे सांगा. एक तर ही सरकारी बाबूमंडळी फार चलाख. पैसे आपण लाच म्हणून घेतच नाही, असा ते पवित्रा घेतात. आणि लाचप्रकरणात जरी ते अडकले तरी त्यांना शिक्षा होत नाही. त्यामुळे त्यांचे काहीच वाकडे होत नाही. मग ते घाबरतील कशाला? मुर्दाडपणा त्यांच्या अंगात इतका भिनला आहे की, समोरचा व्यक्तीच लाजून चूर होतो. मात्र त्यांना पैसे ना मागताना लाज वाटते, ना घेताना!**

लाचप्रकरणात अडकून बदनामी झाली तरी त्याचा परिणाम आपल्या मुलां-बायकोवर काय होईल. समाज काय म्हणेल, याची अजिबात फिकीर त्यांना नसते. उलट त्याच्या घरातील लोकही त्याच्या सवयीचे गुलाम झालेले असतात. त्यांनाही वाटते की, सारे जगच करपटेड आहे. मग माझ्या बापाने किंवा माझ्या नवऱ्याने पैसे खाल्ले म्हणून बिघडले कुठे? असा हा सारा मामला आहे. विशेष म्हणजे आपल्या देशात म्हणा किंवा राज्यात लाचप्रकरणात अडकलेल्या सरकारी बाबूंना शिक्षा कुठे फारशी होते. त्यामुळेच तर सरकारी बाबू अशा टेबलाखालच्या पैशांना चटावला आहे. भ्रष्टाचार थांबवण्यासाठी सरकार काही करणार आहे की नाही असा सवाल उपस्थित होतो. तसे काही करायचे नसेल तर भ्रष्टाचार हा शिष्टाचार आहे, असे जाहीर तरी करायला हवे, म्हणजे याविषयी बोलायचे तरी बंद होईल.





2022 मधील दहा महिन्यांत लाच घेतल्याप्रकरणी 647 गुन्हे दाखल झाले. आणि यात 932 सरकारी नोकरदार अडकले. पुणे विभागात सर्वाधिक 134 गुन्हे, नाशिक विभागात 107 गुन्हे घडले आहेत. लाच प्रकरणात 629 सापळे अन् अपसंपदाचे सात गुन्हे महसूल विभागातील 153, पोलिस 139 अन् महापालिका, जिल्हा परिषद, शिक्षण विभागातील 70 प्रकरणे घडली आहेत. हे आकडे गुन्हे दाखल झालेले आहेत. लाच घेणाऱ्यांचा आकडा यापेक्षा कितीतरी पटीने अधिक आहे. लोकांना आपले काम होणे महत्त्वाचे असते. त्यामुळे पैसे देणे घेणे यात कुणालाच काही वावगे वाटत नाही. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्यावतीने 2017 मध्ये काही आकडे प्रसिद्ध झाले आहेत. यात नऊ वर्षांत फक्त 1 हजार 836 आरोपींनाच शिक्षा झाली आहे आणि तब्बल 6 हजार 452 जण निर्दोष सुटले असल्याचे सांगण्यात आले आहे. भ्रष्टाचार करणाऱ्या आरोपींना जर शिक्षाच होत नसेल तर तो थांबणार कसा? रोज वर्तमानपत्रात आपण वाचतो. अनेकजण शासकीय कर्मचारी लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) जाळ्यात अडकतात. त्यांच्याविरुद्ध विशेष न्यायालयात खटला चालतो. पण शिक्षा मात्र काही थोडक्या लोकांनाच होते. 2008 ते 2017 पर्यंत राज्यात विशेष न्यायालयाने एक हजार 836 लाचखोरांना शिक्षा सुनावली; तर सहा हजार 452 जण निर्दोष सुटले, अशी आकडेवारी सांगते. 'अ' वर्ग अधिकाऱ्यांपासून चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांपर्यंत अनेक सरकारी कर्मचारी तसेच लोकसेवक हे लाच घेताना एसीबी'च्या जाळ्यात अडकतात; मात्र शिक्षा होणाऱ्यांचे प्रमाण कमी असल्याने या लाचखोरांवर अद्यापही हवी तशी जरब बसलेली नाही. हे खरे तर तपास यंत्रणेचे फार मोठे अपयश आहे. लाचेच्या प्रकरणात अनेक सरकारी कर्मचाऱ्यांना शिक्षा, निलंबनाला सामोरे जावे लागलेले असले, तरी अजूनही सरकारी कर्मचारी मोठ्या संख्येने सापळ्यात अडकत आहेत. राज्यात 2016 मध्ये एक हजार 16 जण लाच घेताना पकडले गेले. एक जानेवारी ते 18 डिसेंबर 2017 दरम्यान 889 जण लाच घेताना अडकले. 2019 मध्ये एसीबीने तपास केलेल्या सात गुन्ह्यांतील आरोपींना शिक्षा झाली असून, आरोपींना शिक्षा होण्याचे प्रमाण फक्त 11 टक्के आहे. आतापर्यंत शिक्षा होण्याचे प्रमाण कधीच 28 टक्क्यांच्या पुढे गेलेले नाही. 2018 मध्ये आरोपींना शिक्षा होण्याचे प्रमाण 18 टक्के होते. 2019 मध्ये तर आरोपींना शिक्षा होण्याचे प्रमाण खूपच कमी झाले आहे. गेल्या सहा वर्षांत 2019 मध्ये लाचखोरांना शिक्षा होण्याचे प्रमाण हे सर्वांत कमी आहे. या वर्षी एकूण 64 गुन्ह्यांचा निकाल कोर्टाने दिला आहे. त्यापैकी सात गुन्ह्यांतील आरोपींना शिक्षा झाली आहे. तर, 57 गुन्ह्यांतील आरोपी निर्दोष सुटले आहेत. ही माणसे मुर्दाड बनल्याचेच द्योतक आहे.

सध्या राज्यातील विशेष न्यायालयाच्या आकडेवारीचा विचार केला; तर लाचखोरांना शिक्षा होण्याचे प्रमाण 22 ते 23 टक्के आहे. मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, नागपूर, अमरावती, औरंगाबाद आणि नांदेड परिक्षेत्रात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कार्यालये आहेत. सर्वच भागांमध्ये शिक्षा सुनावण्याचे प्रमाण जवळपास सारखेच म्हणजे कमी प्रमाणात आहे. शिक्षेच्या तुलनेत निर्दोष सुटण्याचे प्रमाण हे 77 टक्के आहे. लाचलुचपत प्रतिबंध विभागाने कशा पद्धतीने तपास करून, किती मजबूत दोषारोपत्र दाखल केले, यावर खटला चालतो. 2017 मध्ये निर्दोष सुटलेल्यांचा विचार केला, तर ही संख्या 316 आहे. त्या तुलनेत शिक्षा झालेल्यांची संख्या ही फक्त 55 आहे. या लाचलुचपत यंत्रणेत तावडीत सापडलेल्या सरकारी कर्मचाऱ्यांना तातडीने शिक्षा होण्याची आवश्यकता आहे. शिवाय पोलिसांनी आणि या संबंधित विभागाने भक्कम पुरावे उभा करून आरोपीला शिक्षा होण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. लाचप्रकरणात अधिक प्रमाणात अडकण्यात पोलिस खातेदेखील अगदी वरच्या क्रमांकावर आहे. त्यामुळे ही माणसे अशा आरोपींकडे सहानुभूतीने पाहतात का, असा प्रश्न निर्माण होतो. आरोपींना जबर शिक्षा बसल्याशिवाय या लाचप्रकरणाला आळा बसणार नाही. पुढच्याला ठेच मागचा शहाणा... अशा उक्तीनुसार मागचा सरकारी बाबू मागे हटायला हवा. पण तसे होताना दिसत नाही. कारण दरवर्षी लाचप्रकरणात अडकणाऱ्यांच्या संख्येत वाढतच होत आहे. सरकारी पातळीवर भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी ठोस उपाययोजना केल्याशिवाय ही कीड थांबणार नाही.

# गोंडपिपरी नगरात विदर्भस्तरीय मराठी कविसंमेलन

## काव्यरसिकांना मिळणार कवितांची मेजवानी

आधुनिक केसरी न्यूज

**गोंडपिपरी :** नगरात प्रथमच धनोजे कुणबी सभागृह येथे विदर्भस्तरीय मराठी कविसंमेलनाचे आयोजन २० नोव्हेंबर २०२२ ला करण्यात आले असून त्यात अनेक दिग्गज कविंच्या कवितांचा पाऊस पडणार असल्याचे आयोजक दुशांत निमकर आणि गणेश कुंभारे यांनी सांगितले आहे.

जीवन गौरव मासिक प्रणित जीवन गौरव साहित्य परिवार महाराष्ट्र राज्य आणि शब्दांकूर फाऊंडेशन, चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने संपन्न होणा-या एकदिवशीय कविसंमेलनाचे अध्यक्ष धनंजय साळवे, गटविकास अधिकारी गडचिरोली, उदघाटक विदर्भ माध्य.शिक्षक संघाचे सरकार्यवाह सुधाकर अडबाले, तर प्रमुख अतिथी श्रीकृष्ण अर्जूनकर गडचिरोली,चेतनसिंह गौर,चेतन ठाकरे,रेखाताई कारेकर,राजेश ठाकूर चामोर्शी यांच्या उपस्थितीत अहमदनगरचे गझलकार रज्जाक शेख,ग्रामकवी आनंदा साळवे, यवतमाळहून लोककवी विजय ढाले या मान्यवरांची देखील उपस्थिती राहणार आहे. संमेलनाचे स्वागताध्यक्ष म्हणून जनता कनिष्ठ महाविद्यालय, गोंडपिपरी येथील प्रा. संतोष बांदूरकर हे राहणार असून सदर कार्यक्रम तीन सत्रात पार पडणार आहे. नियोजनानुसार पहिल्या सत्रात उदघाटन आणि निमंत्रित कवींचे कविसंमेलन,दुस-या सत्रात नोंदणी झालेल्या कवींचे कविसंमेलन आणि तिस-या सत्रात समारोप होणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्चना जिडकुंठावार,नरेशकुमार बोरीकर चंद्रपूर व वंदना डगवार हे करणार आहेत.संमेलनादरम्यान साहित्य लेखन गौरव पुरस्काराचे निकाल घोषित केले जाणार असून मान्यवरांचे हस्ते पुरस्कार प्रदान केले जाईल. विदर्भातील सर्वच जिल्ह्यातून कवी सहभागी होत असून त्यांच्या उत्कृष्ठ कवितांची मेजवानी गोंडपीपरी नगरातील काव्य रसिकांना मिळणार आहे.कविता सादरकर्त्यास स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र व पुस्तक देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. उपस्थित सर्वांसाठी स्नेहभोजनाची व्यवस्था सुद्धा केली जाणार आहे.संमेलनाच्या यशस्वीतेसाठी जीवन गौरव साहित्य परिवार आणि शब्दांकूर फाऊंडेशनचे सभासद प्रयत्न करीत आहेत.



# आमची मर्जी आमचा पेहराव संभाजी भिंडेच्या वक्तव्याचा निषेध

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** तडोळा, ता. अंबाजोगाई येथे सन्मान महिला मंडळ व गाव शाखेच्या पदाधिकारी यांनी, मनुवादी मनुस्मृतीच्या विचारधारेवर संभाजी (मनोहर )भिडे याने मंत्रालयात एका महिला पत्रकाराशी पहिले कुंकु लाव मगच बोल... असे असांविधानिक वर्तन केले त्याचा महिलांनी आमची मर्जी आमचा पेहराव असे म्हणत एकल महिला संघटनेने निषेध नोंदविला. पुरोगामी महाराष्ट्रात भिडे प्रवृत्ती सोकावत चालल्या असून अशा प्रवृत्तींना वेळीच आवर घालण्याची गरज आता निर्माण झाली असल्याची भावना सर्वच महिलांनी या बैठकीत व्यक्त केली. याप्रसंगी सर्वच महिलांनी सडेतोड विचार व्यक्त केले. त्यामध्ये प्रामुख्याने एकल महिला संघटनेच्या कार्यकर्त्या चित्रा पाटील, आशालता पांडे, प्रजावती जोगदंड, शारदा सोनवणे व गावशाखेच्या लीडर्स सुरेखा गिरी, नागराबाई लांडगे, चंपा कदम, अशा गिरी, विद्या थोरात, शितल सावंत, मंदाकिनी कातले, चंद्रकला आडसुळ, पमल सावंत, छाया कदम, सुनिता गाढवे, दैवशाला पुरी, भाग्यश्री आवटे, विमल पांचाळ, ज्ञानेश्वरी कदम, आदी महिला उपस्थित होत्या.



# फर्दापुरात 17 वी अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषद

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या विकासासाठी सर्वोतोपरी मदत : कृषिमंत्री अब्दुल सत्तार

आधुनिक केसरी न्यूज

**फर्दापूर :** सोयगाव तालुक्यातील फर्दापूर येथे दि.811/22 रोजी जगप्रसिद्ध अजिंठा लेण्याच्या परिसरात डॉ.बाबासाहेब आंबेडकर रिसर्च इन्स्टिटयूट ऑफ पाली संस्थेच्या जवळपास 75 एकर जागेवर डॉ.बाबासाहेब आंबेडकर रिसर्च इन्स्टिटयूट उभारण्यासह येथे व्यापक सुविधा निर्माण करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र पर्यटन महामंडळाची जागा मिळवून देण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करून सर्वोतोपरी मदत करू असे प्रतिपादन कृषिमंत्री ना. अब्दुल सत्तार यांनी फर्दापूर येथील 17 वी अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषद प्रसंगी बोलतांना केले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार प्रेरणादायी असून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला दिलेली राज्यघटना जगात सर्वश्रेष्ठ असल्याचे स्पष्ट करीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या घटनेमुळेच माझ्या सारख्या अल्पसंख्याक समाजाचा माणूस मंत्री झाला असे अब्दुल सत्तार म्हणाले.

फर्दापूर (ता. सोयगाव) येथे आज 17 वी अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषद संपन्न झाली. या परिषदेचे उद्घाटन अमेरिका येथील भिक्खु लामा रंगड्रोल यांच्याहस्ते संपन्न झाले. परिषदेच्या अध्यक्षतेस्थानी जपान येथील भिक्खु ताईजो इमानाका होते. परिषदेस धम्मसेवक भन्तेजी चंद्रबोधी महाथेरो, सेवानिवृत्त



सचिव अनिलकुमार गायकवाड तसेच बाळासाहेबांची शिवसेनेचे सोयगाव तालुकाप्रमुख प्रभाकर आबा काळे, सिल्लोड तालुकाप्रमुख देविदास पा. लोखंडे, सिल्लोड नगराध्यक्षा श्रीमती राजश्री निकम, सोयगाव नगराध्यक्षा श्रीमती आशाबी तडवी, सिल्लोड उपनगराध्यक्ष तथा युवानेते अब्दुल समीर, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अर्जुन पा. गाढे, माजी जि.प. उपाध्यक्ष केशवराव तायडे, बाळासाहेबांची शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख किशोर अग्रवाल, माजी उपनगराध्यक्ष संजय आरके, नगरसेवक जितू आरके, नॅशनल सूतगिरणीचे संचालक राजेंद्र ठोंबरे, सयाजी वाघ, सतीश ताठे, विशाल जाधव, संजय मुरकुटे, माजी उपसभापती उस्मान पठाण, अक्षय मगर, रवींद्र बावसकर यांच्यासह देश - विदेशातील भन्तेजींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

पुढे बोलताना ना. अब्दुल सत्तार म्हणाले की, फर्दापूर येथे जागतिक दर्जाचे शिवस्मारका सह - भीमपार्कच्या कामाला आता सुरुवात होणार आहे. भीमपार्क उभारणी कामात भन्तेजी चंद्रबोधी महाथेरो यांनी सहभाग घ्यावा. फर्दापूर पाली सेंटरच्या बाबत मुख्यमंत्र्यांची वेळ घेवून मुंबई येथे बैठक बोलावू असे मंत्री अब्दुल सत्तार म्हणाले. गेल्या वर्षी झालेल्या धम्म परिषदेत येथील रस्त्याचा प्रश्न मार्गी लावू अशी ग्वाही मी दिली होती. येथील रस्त्याचा तिढा सुटल्याने आता रस्त्याच्या कामासह विकास कामांना गती येईल असे ना. अब्दुल सत्तार म्हणाले.

यावेळी संस्थेच्या धम्माचल स्मरणिका व बुद्ध संदेश मासिकेचे प्रकाशन मंत्री अब्दुल सत्तार व मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी मंत्री अब्दुल सत्तार यांनी येथील बौद्ध मूर्ती स्थळी तसेच आलेल्या उपासकांसाठी आयोजित भोजनदान कक्षेला भेट दिली.

# शिक्षण- संरक्षण हक्क अभियान राबवावे : अॅड. नितीन पोळ

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** महाराष्ट्रात क्षुद्र अति क्षुद्र यांना मनुवादी



व्यवस्थेने शिक्षणाचा हक्क नाकारला होता त्या वेळी १८४८ साली महात्मा जोतिबा फुले यांनी देशात सर्वसामान्य जनतेस शिक्षणाची दारे खुली करून दिली मात्र या शैक्षणिक कार्याला अनेक मनुवाद्यांनी विरोध केला त्यावेळी महात्मा फुले व सावित्रीमाई फुले यांच्या शैक्षणिक कार्याला क्रांतिगुरु लहुजी साळवे यांनी संरक्षण करण्यासाठी फौज उभी केली आणि या कार्याला सुरुवात म्हणून महात्मा फुले यांनी सुरू केलेल्या शाळेत आपली पुतणी मुक्ता साळवे हिस शाळेत पाठवण्याचा क्रांतीकारी निर्णय घेतला होता. या शिक्षणाच्या जोरावर मुक्ता साळवे यांनी विद्यार्थी दशेत "आमचा धर्म कोणता?" हा थेट प्रश्न विचारला हे धाडस फक्त शिक्षणामुळे निर्माण झाले होते सद्या देखील मनुवादी व्यवस्था बहुजन समाजातील मुलांना पद्धतशीर पणे शिक्षणा पासून दूर ठेवण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करत असून सरकारी शाळा बंद करण्याचा दुर्दैवी निर्णय घेतला आहे यामुळे गोरगरीब मुलांना शिक्षण संधी नाकारण्याचा प्रयत्न सुरू असून बहुजन समाजाच्या प्रत्येक जागरूक नागरिकांनी या कडे लक्ष देण्याची गरज आहे

१४ नोव्हेंबर ही क्रांतिगुरु लहुजी साळवे यांची जयंती असून २८ नोव्हेंबर ही महात्मा फुले यांची पुण्यतिथी आहे या दोन्ही महामानवांचे बहुजन समाजाला दिलेले शैक्षणिक योगदान लक्षात घेता १४ नोव्हे ते २८ नोव्हे हा पंधरवाड्यात समाजातील परिवर्तन वादी विचारसरणीच्या लोकांनी वाडी वस्ती मध्ये जाऊन समाजातील सर्व गोरगरीब नागरिकांपर्यंत जाऊन शिक्षणाचे महत्व पटवून द्यावे व शिक्षण - संरक्षण हक्क अभियान राबवावे असे आवाहन लोक स्वराज्य आंदोलनाचे प्रदेश अध्यक्ष अँड.नितीन पोळ यांनी केले आहे

# कार्तिक मासानिमित्त सुरु असलेल्या काकड्याची पैठण येथे सांगता

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज मंदिर, पैठण येथे कार्तिक मासानिमित्त सुरु असलेल्या काकड्याची सांगता आज मंगळवार दि. ८ नोव्हेंबर रोजी वाणीभूषण ह.भ.प. श्री. गजानन महाराज नलावडे यांच्या काल्याच्या किर्तनाने झाली. त्यानिमित्त पहाटे ४ वाजता जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज यांच्या मूर्तीस महाभिषेक करण्यात आला. त्यानंतर पहाटे ५ ते ७ या वेळेत काकडा आरती झाली. नंतर सकाळी ८ ते ९ या वेळेत भव्य दिंडी मिरवणूक सोहळा पार पडला. यासाठी परीसरातील असंख्य महिला-पुरुष मोठ्या उत्साहाने व भक्तीभावाने सहभागी झाले होते. यानंतर सकाळी ९ वाजता काल्याच्या किर्तनाला सुरुवात झाली. "हरिने माझे हरिले चित्त, भारवित विसरले" या संत तुकाराम महाराजांच्या गवळणीवर महाराजांनी विस्तृत विवेचन केले. त्यांनी संत तुकाराम महाराजांच्या जीवनातील असंख्य उदाहरणे देऊन या भूमीचे महत्व सर्वांना समजावून सांगीतले. त्यांना साथ-संगत देण्यासाठी भजन सम्राट ह.भ.प. रामेश्वर महाराज सुपेकर उपस्थित होते. या प्रसंगी नाथ संस्थानचे कार्यकारी विश्वस्त श्री. दादा पा.बारे, मा. नगरसेवक श्री. तुषार पाटील हे आवर्जुन उपस्थित होते. तसेच पैठण परिसरातील विविध सांप्रदायीक संस्थांचे प्रमुख उपस्थित होते. काल्याच्या किर्तनानंतर माजी नगरसेवक श्री कृष्णा भाऊ मापारी यांच्या महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली.



# लालपरीला दिवाळीत धनलाभ

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** गणेशोत्सव, नवरात्रीनंतर राज्य एसटी महामंडळाला दिवाळी महत्वाची ठरली असून नाशिक विभागाला सुमारे 11 कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले असून महामंडळाची दिवाळी गोड झाली आहे. नाशिक विभागातून नाशिक एक आगाराने सर्वाधिक उत्पन्न मिळवले आहे. तर 15 लाख प्रवाशांची वाहतूक केली आहे. कोरोनाचे निर्बंध हटल्यामुळे दिवाळीच्या 10 दिवसांच्या काळात एसटी महामंडळाच्या बसमधून दीड कोटी प्रवाशांची प्रवास केला. या माध्यमातून एसटीला 11 कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले. दिवाळीच्या काळात प्राप्त झालेल्या उत्पन्नातून एसटीचा तोटा कमी होण्यास मदत होणार आहे. त्याचबरोबर पर्यटनासह धार्मिक ठिकाणी जाण्यासाठी प्रवाशांची यावेळी मोठी गर्दी होत आहे. कोरोना संसर्गाच्या संकटामुळे नागरिक दोन वर्ष दिवाळी साजरी करू शकले नाहीत. परंतु यंदा सर्व निर्बंध शिथिल करण्यात आल्याने दिवाळी उत्साहपूर्ण वातावरण साजरी करण्यात आली. दिवाळीच्या सुट्टीत गावी तसेच पर्यटनासाठी जाण्याकडे नागरिकांचा कल असतो. यामुळे यंदा राज्य महामार्ग परिवहन महामंडळ देखील प्रवासी वाहतुकीसाठी मोठ्या संख्येने बस उपलब्ध करून दिल्या होत्या. दिवाळी सुट्टीच्या काळात दहा टक्के प्रवासी भाडेवाढ देखील करण्यात आली होती. त्यामुळे महामंडळाला या प्रवासी वाहतुकीतून मोठे आर्थिक उत्पन्न मिळाले आहे. महामंडळाची एकूण 13 आगार असून त्यांना दिवाळीच्या सुट्टीत दहा कोटी 99 लाख 36 हजार रुपयांची उत्पन्न मिळाले आहे.

# दीपावलीच्या सुट्ट्यांनंतर वाजली शाळेची घंटा

## गुरुजींच्या कानी पडणार पुन्हा विद्यार्थ्यांचा किलबिलाट



आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील जि.प.मराठी शाळेत दिपावलीच्या दिर्घ सूट्या नंतर आज औरंगाबाद जिल्हयातील शाळेत शालेय परिसर पुन्हा विद्यार्थ्यांनी फूलणार असून सोयगाव तालुक्यात व सावळदबारा परिसरात देव्हारी, टिटवी, डाभा, मोलखेडा, सावळदबारा सह शाळा दिनांक ०९ नोव्हेंबर रोजी शाळेची घंटा वाजली आहे. या आनंदा मुळे विदयार्थ्यांचा किलबीलाट पुन्हा गुरुजीच्या कानी पडणार आहे. बुधवारी सोयगाव तालुक्यातील सर्वच शाळा सुरु होत असल्यामुळे विदयार्थ्यां सह पालक वर्गात उत्साहाचे वातावरण पाहावयास मिळत आहे. सविस्तर वृत्त असे की, सोयगाव तालुक्यातील सर्व शाळानां दिपावलीची सुट्टी जाहिर झाल्याने शालेय मुलांना आनंद झाला होता. आता आपण मामाच्या गावाला जाणार व मज्जाच मज्जा करणार या ऊत्साहाने शालेय मुला बरोबर गुरुजनांना पण दिपावलीच्या सुट्ट्यांचा आनंद उपभोगता येणार म्हणून अनेकांनी देव दर्शन व प्रेक्षनिय स्थळांचे नियोजन करून आनंदत्सव केला. त्या नंतर विस दिवशाच्या शालेय सुट्याचा मंगळवार शेवटचा दिवस ठरला आणि दि.९/११/२२ बुधवार रोजी सकाळीच जि.प.मराठी शाळेत केंद्र प्रमुख एम.डी.सोनवणे यांनी घंटा वाजवली परिसरात सर्वत्र शाळेचा परिसर विद्यार्थ्यांनी फुलून गेल्याने आनंद झाला. आज शाळेत पुन्हा विद्यार्थ्यांची गर्दीं होणार या आनंदात आज शालेय परिसरात मुलांची गर्दीं होणार असल्याने शालेय परिसरात आंनदी वातावरण पाहायला मिळाले.





# नेपाळ, दिल्लीला भूकंपाचे धक्के

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** नेपाळमध्ये बुधवारी पहाटे भूकंपाचा धक्का बसला असून यामध्ये ६ जणांचा मृत्यू झाला आहे. येथील डोटी जिल्ह्यात काही घरेदेखील पडली आहेत. ६.३ रिश्टर स्केलच्या या भूकंपाचे हादरे राजधानी दिल्ली परिक्षेत्रातही बसले आहेत. नेपाळमधील डोटी जिल्ह्यामध्ये पहाटेच भूकंप झाल्याची घटना घडली. या भूकंपात आतापर्यंत ६ जणांचा मृत्यू झाला आहे. तर ५ जण जखमी झाले आहेत. जखमी नागरिकांना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून नेपाळच्या लष्कराकडून बचावकार्य केले जात आहे. या भूकंपात अनेक घरेदेखील जमीनदोस्त झाली आहेत. या भूकंपाचे धक्के रात्री २ वाजता राजधानी दिल्ली परिक्षेत्रातही जाणवले. येथे रात्री २ वाजता भूकंपाचे सौम्य धक्के बसले. या भूकंपाची खोली जमिनीपासून १० किमी खाली असल्याची माहीती येथील राष्ट्रीय भूकंप विज्ञान केंद्राने दिली आहे. या भूकंपामध्ये मृत्यू झालेल्यांची ओखळ अद्याप पटलेली नाही. मात्र मृतांमध्ये एक महिला आणि दोन मुलांचा समावेश आहे. दरम्यान मागील २४ तासांमधील नेपाळमधील हा दुसरा भूकंपाचा धक्का आहे. याआधी मंगळवारी सकाळी ४.५ रिश्टर स्केल तीव्रतेचे भूकंपाचे धक्के जाणवले होते.

# बोधेगावचे ग्रामीण रुग्णालय असून अडचण नसून खोळंबा

## रुग्णालयातील रिक्त असलेली पदे भरा म्हणजे रुग्णांची होणारी हेळसांड थांबेल : संगीता ढवळे

आधुनिक केसरी न्यूज

**जयप्रकाश बागडे**

**शेवगाव :** तालुक्याच्या पूर्व भागातील बोधेगाव येथे ग्रामीण रुग्णालय असून देखील मुख्य वैद्यकीय अधिक्षक व अधिकाऱ्यासह मंजूर 25 पैकी 13 पदे रिक्त असल्याने नागरिकांना आरोग्याच्या दृष्टीने पुरेशा सुविधा वेळेवर मिळत नसल्याने रुग्णाची नेहमी हेळसांड होऊन गैरसोयमुळे आरोग्य यंत्रणेचा पूर्ण बोजवारा उडाला आहे. रुग्णालय असून अडचण नसून खोळंबा अशी परिस्थिती झाली असल्याने रिक्त पद भरावीत अन्यथा संघटनेच्या वतीने ज्यांना आंदोलन छेडण्याचा इशारा देखील लवकरच देण्यात येणार असल्याचे वंचित बहुजन आघाडीच्या महिला शेवगाव तालुका अध्यक्ष संगीताताई ढवळे यांनी म्हटले आहे.




कोरोनाचा मुकाबला करण्यासाठी जगात सतर्कता बाळगून विविध उपाय योजना हाती घेण्यात आल्या, आरोग्य विभाग खडबडून जागे झाले मात्र बोधेगाव ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी वैद्यकीय अधिकारी व साधन सामुग्री नसल्याने रुग्णालय शोभेचे वस्तू बनले आहे. बोधेगाव व परिसरातील नागरिकांना अनेक वर्षापासून सुविधा उपलब्ध होत नाहीत, सर्व सामान्य व गोर गरीबांना त्याचा काहीही फायदा होत नसून त्यांना खाजगी रुग्णालयात महाग उपचार करावे लागतात. गावातील महत्वाच्या प्रश्नाकडे सर्वच लोकप्रतिनिधी नी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्यामुळे वंचित बहुजन आघाडी बोधेगाव लवकरच वंचित बहुजन आघाडीचे राज्य उपाध्यक्ष प्रा.किसन चव्हाण यांच्या मार्गदर्शनात व बन्नूभाई शेख जिल्हाउपाध्यक्ष ,संगीताताई ढवळे महीला तालुकाध्यक्ष ,धोंडीराम मासालकर बोधेगाव शहराध्यक्ष यांच्या नेतृत्वात व वंचित चे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते व गावकरी व परिसरातील नागरिकांसह मोठे जन आंदोलन करणार आहोत व मागणी पूर्ण होईपर्यंत वंचित बहुजन आघाडी पाठपुरावा करणार आहे.

# हिमाचल प्रदेशमध्ये काँग्रेसला धक्का

## काँग्रेसच्या २६ नेत्यांनी धरली भाजपाची वाट

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** देशभरात गुजरात विधानसभा निवडणुकांची एकीकडे चर्चा सुरू असताना दुसरीकडे हिमाचल प्रदेशमध्ये काँग्रेसमध्ये मोठा राजकीय भूकंप झाल्याचे पाहायला मिळत आहे. राज्यात मतदानासाठी अवघे चार दिवस शिल्लक राहिले असताना हिमाचल प्रदेशमध्ये काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. काँग्रेसच्या जवळपास २६ नेत्यांनी पक्षाला रामराम ठोकत भाजपाची वाट धरली आहे. खुद्द मुख्यमंत्री जयराम ठाकूर यांनी यासंदर्भात ट्वीट करून माहिती दिली आहे. या निवडणुकांमध्ये राज्यात आपली छाप सोडत भाजपाच्या सत्तेला आव्हान देण्याच्या निर्धाराने मैदानात उतरलेल्या काँग्रेससाठी हा मोठा धक्का मानला जात आहे. येत्या १२ नोव्हेंबर रोजी हिमाचल प्रदेशमध्ये विधानसभा निवडणुकांसाठी मतदान होणार आहे. तर पुढील महिन्यात १२ डिसेंबर रोजी मतमोजणी नियोजित आहे. त्यात काँग्रेसला हा मोठा झटका बसला आहे. हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री जयराम ठाकूर, भाजपाचे हिमाचल प्रदेश निवडणूक प्रभारी सुधान सिंग, संजय सूद हे या पक्षप्रवेशावेळी उपस्थित होते. काँग्रेस सोडणाऱ्या २६ नेत्यांमध्ये प्रदेश काँग्रेस कमिटीचे माजी सचिव धरमपाल ठाकूर खंड यांचाही समावेश आहे.

# शिष्यवृत्ती परीक्षेत डफळापूर शाळा नं. 2 चे यश

आधुनिक केसरी न्यूज


**जत :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात आलेल्या पूर्व उच्च माध्यमिक (इयत्ता - पाचवी) शिष्यवृत्ती व पूर्व माध्यमिक (इयत्ता-आठवी) शिष्यवृत्तीचा निकाल नुकताच ऑनलाईन जाहीर करण्यात आला. डफळापूर येथील जिल्हा परिषद मुलींची शाळा नं 2 या शाळेतील विद्यार्थीनींनी या परीक्षेत सलग पाचव्या वर्षी उज्ज्वल यश संपादन केले. राज्याचा निकाल 23.90 टक्के लागला तर शाळेचा निकाल 90.91 टक्के लागला. असे शाळेचे मुख्याध्यापक अरविंद बंडगर यांनी सांगितले. डफळापूर केंद्रात या शाळेच्या पहिल्या पाच मधील चार विद्यार्थ्यांनींनी क्रमांक पटकाविले. यामध्ये शांभवी गोविंद कुलकर्णी (267), चेतना शरद माळी (216), श्रेया श्रीशैल वठारे (208), समीक्षा सुरज महाजन (198), श्रावणी विनायक छत्रे (196), रिद्धी विकास शिंदे (182), तनुष्का माणिकराव माने (170), श्वेता सागर चव्हाण, समीक्षा अनिल वगरे (132), श्रेया श्रीकांत म्हेत्रे (132) यांनी यश मिळविले. सर्व यशस्वी विद्यार्थीनींचे शिक्षणविस्ताराधिकारी तानाजी गवारी व अन्सार शेख, केंद्र प्रमुख रतन जगताप, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संदीप चव्हाण, उपाध्यक्ष दत्तात्रय माळी व सर्व एस.एम.सी सदस्य यांनी कौतुक केले. उदयोगरत्न संकपाळ, अलका पवार, शंकर कुंभार, दीपाली पट्टणशेट्टी, रेखा कोरे, सुषमा चव्हाण, अजय डोंगरे यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे.

# ज्येष्ठांनी वर्तमानात रमावे, ध्यान धारणा करावी : सचिन कुसनाळे




आधुनिक केसरी न्यूज

**सांगली :** अखिल भारतीय शिक्षक साहित्य कला क्रीडा मंडळ,शाखा सांगलीच्यावतीने नुकतेच काव्य गुंजन व काव्य सरिता हा साहित्यिक कार्यक्रम वृध्द सेवाश्रम, सांगली येथे संपन्न झाला. सामाजिक बांधिलकी जपत मंडळाच्यावतीने वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांसाठी मनोरंजनपर या कार्यक्रमाचे नुकतेच आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्‌घाटन मंडळाचे राज्य प्रसिद्धी प्रमुख साहित्यिक सचिन कुसनाळे यांच्याहस्ते झाले. कार्यक्रमास उपस्थितांचे स्वागत मंडळाचे सांगली जिल्हाध्यक्ष महेशकुमार कोष्टी यांनी केले. प्रास्ताविक मंडळाचे समन्वयक प्रा. अरुण कांबळे सर यांनी केले. काव्यगुंजन कार्यक्रमामध्ये बालकलाकार हर्षदा कोष्टी, साहित्यिक डॉ. अनिता खेबुडकर, महेशकुमार कोष्टी,अश्विनी कुलकर्णी, अविनाश सगरे तसेच वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिक यांनीही सहभाग घेतला. काव्य सरिता या काव्य सादरीकरणाच्या कार्यक्रमामध्ये मंडळाचे उपाध्यक्ष कवी मुबारक उमराणी, डॉ. विजयकुमार माने, डॉ. व्यंकटेश जंबगी, डॉ. अनिता खेबुडकर, सचिन कुसनाळे, सरिता माने, वैभव चौगुले, अश्विनी कुलकर्णी, महेशकुमार कोष्टी, अविनाश सगरे, ऋतुजा माने आदी कवींनी सहभाग घेतला.ज्येष्ठांनी ध्यानधारणा करावी, गतकाळापेक्षा वर्तमानात रमावे असे प्रतिपादन साहित्यिक सचिन कुसनाळे यांनी यावेळी आपल्या उद्‌घाटनपर भाषणात केले. सूत्रसंचालन सरिता माने यांनी केले. तर आभार प्रदर्शन मुबारक उमराणी यांनी केले. कार्यक्रमास अनेक मान्यवर साहित्यीक, रसिकश्रोतेही उपस्थित होते.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त नगीनाघाटावर गोदावरी पूजन

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त भाजपा नांदेड महानगर लायन्स क्लब नांदेड सेंट्रल, लायन्स क्लब नांदेड अन्नपूर्णा व अमरनाथ यात्री संघाच्या वतीने नगीनाघाट नांदेड येथे गोदावरी गंगा पूजनाचे आयोजन करण्यात आले. सुरुवातीला गंगा माता, भारत माता, गुरुनानकजी व सुधाकरराव डोईफोडे यांच्या प्रतिमेचे पूजन वर्षा ठाकूर, भाजपा जिल्हाध्यक्ष प्रवीण साले, लंगर साहब गुरुद्वाराचे बाबा सुबेकसिंघ, ज्येष्ठ पत्रकार शंतनू डोईफोडे व वैद्यकीय आघाडीचे जिल्हाध्यक्ष डॉ. सचिन उमरेकर यांच्या हस्ते करण्यात आले. संयोजक दिलीप ठाकूर यांनी आपल्या प्रास्ताविकातून उपक्रम घेण्यामागची भूमिका स्पष्ट करून पुढील वर्षी महिलांनी हिरव्या रंगाच्या साड्या परिधान करावे असे आवाहन केले. यावेळी वर्षा ठाकूर यांनी आपल्या भाषणातून अंधारातून प्रकाशाकडे जाणा-या या आगळ्यावेगळ्या कार्यक्रमाचे कौतुक करून दिलीप ठाकूर हे अनेक संवेदनशील उपक्रम निस्वार्थपणे राबवित असल्याबाबत समाधान व्यक्त केले. प्रवीण साले यांनी मार्गदर्शन करताना हिंदू धर्मात त्रिपुरारी पौर्णिमेचे असलेले महत्त्व सांगून दिलीप ठाकूर हे आयोजित करत असलेल्या ७६ उपक्रमाचा आढावा घेतला. भाजपा महिला मोर्चा प्रदेश कार्यकारणी सदस्य संध्या राठोड यांचे समायोजित भाषण झाले. संतोषगुरु परळीकर यांनी शास्त्रोक्त गंगापूजनचे महत्व विशद केले. सालासर भजनी मंडळाच्या गिरीराज लोहिया, राजेश बच्चेवार, भजनसम्राट एम.गणेशअण्णा, जगदीश धूत यांनी सवाद्य पाच आरत्या गायल्या.प्रतिष्ठित व्यापारी योगेश जायस्वाल यांच्यातर्फे पाच हजार द्रौण, दिवे व फुलांची व्यवस्था करण्यात आली. पाच वाजता वेळेवर आलेल्या व शिस्तीत बसलेल्या १००० महिलांना माजी नगरसेविका जयश्री ठाकूर, अमृता जायस्वाल, अर्चना आशिष काबरा, पूर्वा शोभित जायस्वाल यांच्या हस्ते भेटवस्तू देण्यात आल्या.उत्कृष्ट पूजेची थाळी सजऊन आणलेल्या २१ महिलांची निवड भाजपा महिला मोर्चा प्रदेश कार्यकारणी सदस्य डॉ. शीतल भालके, अखिल भारतीय क्षत्रिय राजपूत महासंघाच्या प्रदेशाध्यक्ष सुषमा ठाकूर व नयना गिरगावकर यांनी केली. या महिलांना मोर बाबा, बाबा हरिसिंग, संघटन सरचिटणीस विजय गंभीरे, जिल्हा सरचिटणीस अशोक धनेगावकर, मंडलाध्यक्ष आशिष नेरलकर, जिल्हा उपाध्यक्ष बागड्या यादव व कामाजी कदम, मंडलाध्यक्ष सूर्यकांत कदम, सुरेश लोट, लायन्स अध्यक्ष शिवा शिंदे, युवती प्रमुख महादेवी मठपती यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. संस्कार भारती तर्फे काढण्यात आलेल्या भव्य रांगोळी सोबत अनेकांनी सेल्फी काढल्या. भाऊ ट्रॅव्हल्स व माय हॉलिडेज द्वारे आगामी काळात आयोजित करण्यात येणाऱ्या आठ सहलीचे भाग्यवान सोडतीचे कुपन वितरित करण्यात आले. त्यानंतर महिलांनी आपल्या परिवारातील सदस्यांना दीर्घायुष्य लाभावे यासाठी गोदावरी पात्रात पळसाच्या द्रोणात असलेले दिवे सोडले.हे नयनमनोहर दृश्य पाहण्यासाठी नगीनाघाट वर प्रचंड गर्दी झाली होती. यावेळी धन्यवाद मोदीजी या उपक्रमांतर्गत पंतप्रधानांना पाठविण्यात येणाऱ्या पत्रलेखकांची सोडत काढली असता भाग्यवान ठरलेल्या श्रद्धा दमकोंडवार यांना दिलीप ठाकूर यांच्यातर्फे मोबाईल भेट देण्यात आला. पत्र जमा करण्यासाठी अमरनाथ यात्री संघाचे कोषाध्यक्ष अनिल चिद्रावार व राजेशसिंह ठाकूर यांनी मेहनत केली.नांदेडच्या गंगापूजनाची महती देश पातळीवर पोहोचवणाऱ्या माध्यम प्रतिनिधींचा यावेळी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे रंगतदार सूत्रसंचलन धीरज स्वामी तर आभार कामाजी सरोदे यांनी मानले.महापालिकेच्या जीव रक्षकांनी कोणतीही दुर्घटना होऊ नये यासाठी नदीपात्रात चोख कामगिरी बजावली. वजीराबाद पोलीस स्टेशन तर्फे पुरेसा बंदोबस्त ठेवण्यात आला होता. ग्रहणानंतर स्नान करणाऱ्या महिलांना कपडे बदलण्यासाठी स्वतंत्र रूमची व्यवस्था दिलीप ठाकूर यांनी केली होती. गोदावरी गंगा पूजनाच्या उपक्रमात सुहास पाटील, शशिकांत पाटील, श्रीराज चक्रवार, गणेश कोकुलवार, बालाजी मंदिरचे महंत कैलास महाराज वैष्णव, दिमाकाका देशमुख, शिख सेल जिल्हाध्यक्ष कृपालसिंग हुजूरिया, जसबीरसिंह धुपिया,चंचलसिंघ जट,सुभाष देवकत्ते, गजानन उबाळे, धोंडोपंत पोपशेटवार, दत्तात्रय कोळेकर, शिवाजी पाटील , बालाजी चव्हाण यांच्यासह अनेकांनी हा नयनमनोहर सोहळा अनुभवला. अनुराधा गिराम,अपर्णा चितळे, पुनमकौर धुपिया, विमल शेट्टी, अनिता चिद्रावार,लक्ष्मी पतंगे, प्रगती निलपत्रेवार, विजया गोडघासे,पूनम चव्हाण, मेघा कोळेकर,नंदा चौहाण, पुजा बिसेन, रेखा मनाठकर, शोभा चौहाण,रत्नप्रभा गोपुलवाड, रंजिता चौहाण, निलावती हिवराळे, प्रणिता कुलकर्णी, संतोषी चौहाण, यांच्यासह शेकडो महिला केशरी साड्या परिधान केल्यामुळे वातावरण भगवेमय झाले. कार्यक्रम संपल्यानंतर गुरूद्वारा लंगरसाहब तर्फे ठेवण्यात आलेल्या महाप्रसादाचा सर्वांनी लाभ घेतला.गोदावरी गंगापुजन यशस्वी करण्यासाठी लायन्स अन्नपूर्णा अध्यक्ष अरुणकुमार काबरा, राजेशसिंह ठाकूर, संदीप छापरवाल, संतोष भारती, कपिल यादव, किरण मोरे, संजय राठोड, गणेश बिरकुरे, प्रदीपसिंह हजारी, विनायक कांबळे, सिताराम क्षीरसागर यांनी परिश्रम घेतले.दुसऱ्या दिवशी सकाळी महापालिका स्वच्छता कर्मचाऱ्यांनी नगीना घाट परिसर स्वच्छ केला. हरिद्वार व वाराणसी नंतर भव्य प्रमाणात नांदेड येथे होणाऱ्या गंगेच्या आरतीचे सतत वीस वर्ष आयोजन करीत असल्याबाबत दिलीप ठाकूर यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.



# महाराष्ट्र सायकल भ्रमंती करण्यासाठी निघालेले सर्जेराव बढे यांचा सत्कार



आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** महाराष्ट्र सायकल भ्रमंती करून आलेले व तसेच पुन्हा एकदा सायकल हा नवोपक्रम सुरु केलेले सर्जेराव अशोक बढे यांचा ताडपिंपळगांव, ता. कन्नड, जि. औरंगाबाद येथे सत्कार करण्यात आला, सर्जेराव अशोक बढे रा. दावडी, ता. खेड, जि. पुणे येथील रहिवाशी आहेत. व सध्या जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षक म्हणून वासोळे, ता. वाई, जि. सातारा या शाळेमध्ये ज्ञानदानाचे कार्य करत आहेत. सायकल चालवणे हा त्यांचा छंद असून ते मागील तीन वर्षापसून सायकल चालवतात सध्याच्या धकाधकीच्या जीवनात आरोग्याकडे होणारी हेळसांड लक्षात घेता व्यायामाचे खूपच महत्व आहे. सायकल हे एक पर्यावरण स्नेही प्रवासाचे साधन असून ... प्रवासासोबत त्यातून होणारा व्यायाम हा वैयक्तिक आरोग्य चांगले ठेवण्याची गुरुकिल्ली आहे हेच स्वतःला झालेले सायकलचे फायदे इतरांनाही व्हावे या शुद्ध हेतूने ते ..."पुन्हा एकदा सायकल" हे ब्रीद घेऊन पूर्वीच्या काळाप्रमाणे गरजेनुसार सायकलचा वापर करावा यासाठी महाराष्ट्रातील विविध लहान-मोठी शहरे, खेडी, वाडी, वस्ती यात सायकलवर फिरत छोट्या अंतराच्या प्रवासासाठी गरजेनुसार सायकलचा जास्तीतजास्त वापर करावा यासाठी लोकांना संदेश देत आहेत. तसेच वाटेत भेटणाऱ्या विविध गावांचा सांस्कृतिक, सामाजिक इतिहास जाणून घेण्याचा प्रयत्न करत आहे. सर्जेराव अशोक बढे सर यांच्या सत्काराचे आयोजन श्री गणेशा कॉम्प्युटर्स देवगाव रंगारीचे संचालक संतोष बल्हाळ व भारत बल्हाळ व ताडपिंपळगांव येथील समस्त ग्रामस्थ यांच्यातर्फे आयोजन करण्यात आले तसेच सर्जेराव अशोक बढे व भारत बल्हाळ हे डी. एडचे शिक्षण घेण्यसाठी मुंबई वरळी हॉस्टेलला सोबत होते. सर्जेराव अशोक बढे सर यांचा सत्कार गावातील प्रथम नागरिक सरपंच श्री. अरुण सर सोनवणे सर यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच अभिमन्यू मगरे यांनी सर्जेराव बढे सर यांच्याविषयी माहिती सांगितली व कृष्णा सोनवणे सर (जि. प. शिक्षक) यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले व त्यानंतर सर्जेराव बढे सर यांनी आपले मनोगत व्यक्त केले यावेळी उपस्थित कन्नड तालुका माळी महासंघाचे अध्यक्ष कार्तिक मामा सोनवणे, उपसरपंच सतिश शेळके, पोलिस पाटील प्रकाश दिवेकर, रमेश मालकर सर (जि. प. प्राथमिक शाळा मुख्याध्यापक) रामभाऊ सोनवणे सर (जि. प. शिक्षक), लोमेश काळे सर (जि. प. शिक्षक), अमोल सोनवणे सर , आनंद गवळी सर, शेषराव शिरसे, बापू मुंजाळ, अशोक राहणे, शाईनाथ जाधव (बाबाजी), निलेश सोनवणे, सागर राजेंद्र सोनवणे, मच्छिंद्र मालकर शेठ, रामेश्वर शेळके, योगेश सोनवणे, प्रभू जाधव आदी ग्रामस्थ उपस्थित होते.




# प्रा. चंद्रकांत चन्ने यांच्या काव्यसंग्रहाचे 12 रोजी प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** ज्येष्ठ चित्रकार, कलाभ्यासक आणि कलाशिक्षक प्रा. चंद्रकांत चन्ने यांच्या "अनुत्तरित काळा कॅनव्हास ...." या कवितासंग्रहाचा प्रकाशन समारंभ शनिवार, 12 नोव्हेंबर रोजी सायंकाळी 6 वाजता विदर्भ साहित्य संघाच्या सांस्कृतिक संकुलाच्या चौथ्या मजल्यावरील अमेय दालनात आयोजित केला आहे. विदर्भ साहित्य संघ आणि विजय प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या समारंभाच्या अध्यक्षस्थानी विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष प्रदीप दाते असून, जेष्ठ कवी आणि समीक्षक प्रा. वसंत आबाजी डहाके यांचे हस्ते काव्यसंग्रहाचे प्रकाशन होईल. ज्येष्ठ कवी प्रफुल्ल शिलेदार आणि चित्रकार-गझलकार बाबर शरीफ या पुस्तकावर भाष्य करतील. नाटककार दिनकर बेडेकर यांची विशेष उपस्थिती राहील. साहित्यरसिक आणि कलाप्रेमी नागरिकांनी समारंभास आवर्जून उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# मुलांवर प्रेम करा : राष्ट्रसंत आचार्य पुलकसागर महाराज

आधुनिक केसरी न्यूज

**लासूर स्टेशन :** मुलांवर प्रेम करा मात्र त्यांचे भविष्य बिघडु नये यांची पालकांनी काळजी घ्यावी आता पैसा भरपूर आहे, घरेही खूप अलिशान आहेत मात्र सर्वात मोठी समस्या कुंटूब एकत्र राहत नाही वेगवेगळे राहत आहे प्रवचना प्रसंगी राष्ट्रसंत आचार्य पुलकसागर महाराज यांनी सांगितले. लासूर स्टेशन ता गंगापूर येथे परम पूज्य श्री राष्ट्रसंत आचार्य मुनीश्री पुलक सागर महाराज यांचे लासुर स्टेशन येथे आगमन झाले असून त्यांचे संपूर्ण राजस्थानी समाजातर्फे मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले ते रोज सकाळी चार दिवस प्रवचन देणार असून दि ८ रोजी सकाळी नऊ ते दहा दरम्यान प्रवचनासाठी राजस्थानी समाज सह इतर समाजही मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी महाराजांनी आज सासू आणि सासऱ्याने सुने सोबत कसे वागावे याचे सविस्तर असे सांगितले की सासऱ्यांनी सुनेसाठी संध्याकाळी घरी जाताना सुने साठी काहीतरी गुलाब जामुन घेऊन जावे जेणेकरून सून सासऱ्यांना आपले वडील समान करतील व सासूंनी बाहेर गावी गेल्यावर सुनांसाठी एक जर साडी आणली तर सून समजेल की बाहेर प्रदेशात गेल्यावरही माझी सासू मला विसरत नाही, त्याकरीता सुन आपल्या सासऱ्याने सासूचे एवढे कौतुक करेल की माझ्या माहेरीपेक्षा सासरे कधीही चांगले जर सुनेचा भाऊ सुनेला घेण्यासाठी आला तर सून पहिले विचारेल की माझ्या सासूंना विचारा कि मी माझ्या बहिणीला घेण्यासाठी आलो आहे तिला पाठवा जर माझ्या सासू ने हा म्हणले तर मी येण्यास तयार आहे भावांनी बहिणीच्या सासूला विचारलं की मी माझ्या बहिणीला घेण्यासाठी आलो आहे तर सासू म्हणते ती तुझी बहीण असली तर घेऊन जाय परंतु दोन दिवसात लवकर पाठव नाही तर मी माझ्या मुलाला घ्यायला पाठवेल त्यानंतर सून ही माहेरी जाते आणि तिथे सुनेचे वडील तिला विचारतात की तुझी खट्याळ सासू कशी आहे तर ती सून म्हणते पप्पा माझी सासु ही माझ्या आई पेक्षाही चांगले आहे तर वडील विचारतात की तुझे सासरे कसे आहेत की पप्पा माझे सासरे हे तुमच्या पेक्षाही चांगले असून संध्याकाळी माझ्यासाठी काही ना काही खायला घेऊन येतात त्यामुळे मी माझ्या सासू आणि सासरे सर्व ध्यान ठेवत असल्याने ते मला आपल्या मुली सारखे ठेवतात यावेळी मोठ्या संख्यानी समाज बांधव उपस्थित होते





# आदित्य ठाकरे यांनी केले आंतरराष्ट्रीय तलवारबाजी खेळाडू वैदेहीचे अभिनंदन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय तलवार बाजी खेळात निपुण असलेल्या संभाजीनगरची वैदेही संजय लोहिया हिचे ८ नोव्हेंबर शिवसेना नेते, युवा सेना प्रमुख आदित्य ठाकरे यांनी पाठीवर कौतुकाची थाप देऊन अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.
वैदेही लोहिया हिला लहानपणापासूनच तलवारबाजीची आवड होती. आज ती १७ वर्षाची असून साई एनसीओई येथे प्रशिक्षक श्रेया चिब यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेत आहे, वैदेहीने आजपर्यंत अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर दैदीप्यमान यश मिळवले आहे. याची दखल घेत शिवसेना नेते युवासेना प्रमुख आदित्यजी ठाकरे व राज्याचे विधान परिषद विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी आज वैदेहीची भेट घेऊन तीचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

**वैदेही लोहियाचे कार्यप्रदर्शन**

1) 6 ऑक्टो 22 ते 13 टीजी 22 ऑक्टो आशियाई अंडर-23 तलवारबाजी चॅम्पियनशिप (रँकः 20)कुवैत

2 )24 फेब्रुवारी 22 ते 03 मार्च 22 - आशियाई कॅडेट आणि ज्युनियर फेंसिंग चॅम्पियनशिप ( रँकः IND : 16 , टीम : 3) उझबेकिस्तान

3 )23 ऑक्टोबर 2018 ते 28 ऑक्टोबर 2018- आशियाई अंडर-23 फेन्सिंग चॅम्पियनशिप (रँकः 36) बँकॉक, थायलंड, ४) २५ डिसेंबर ते २८ डिसेंबर 29वी ज्युनियर राष्ट्रीय तलवारबाजी चॅम्पियनशिप (रँकः IND: 6वी, टीमः 2रा)सोनीपत 5)29 जुलै ते 2 जुलै 2022 30वी ज्युनियर राष्ट्रीय तलवारबाजी चॅम्पियनशिप (रँकः IND: 6वी, टीमः 3री) कटक

6 )13 मार्च ते 16 मार्च 22 32 वी वरिष्ठ राष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धा (रँकः टीमः कांस्य) अमृतसर

7) 19 ते 21 मार्च 2022 31वी वरिष्ठ राष्ट्रीय तलवारबाजी चॅम्पियनशिप (रँकः टीमः 3) उत्तराखंड

8 )9 डिसेंबर ते 12 डिसेंबर 2019 64वी SFFI (टीमः गोल्ड, इंडः गोल्ड) नाशिक 9) 7 जानेवारी ते 11 जानेवारी 2017 62 वी एसजीएफआय (रँकः टीमः 2) नालगोंडा

# यवतमध्ये आरोपीचा पोलिसावर गोळीबार

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** घरफोडीतील आरोपी पकडण्यासाठी गेलेल्या पुणे शहर पोलिसांवर गोळीबार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. दौंड तालुक्यातील यवतमध्ये ही घटना घडली आहे. पुणे शहर युनिट 3 मधील पोलिसांवर आरोपीने गोळीबार केला आहे. या सगळ्या प्रकरणात एकाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे तर दुसऱ्या आरोपीला पळून जाण्यात यश आले आहे. बुधवारी पहाटेच्या सुमारास ही घटना घडली आहे. या प्रकारणी यवत पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.
पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यामुळे आरोपीला शोधण्यासाठी यवतमध्ये पोलीस आले होते. रात्रीपासून पोलीस या परिसरात तैनात होते. पहाटे दोन पोलीस घराजवळ आले आहेत. याची माहिती आरोपींना मिळाली होती. त्यानंतर एका आरोपीने त्या ठिकाणाहून पळ काढला. मात्र दुसऱ्या आरोपीने पोलिसांवर गोळीबार केला.
मागील काही महिन्यापासून राज्यभरात पोलिसांच्या मारहाणीच्या प्रकरणांमध्ये वाढ झाली आहे. पोलिसांना असे मारहाण करत, कायदा हातात घेण्याचा अधिकार आहे का? किंवा तरुणांना धाक नेमका कुणाचा असा प्रश्न सध्या उपस्थित केला जात आहे.

# नितीन गडकरींनी केले विदर्भातील पहिल्या हिंदी चित्रपटाच्या कलाकारांचे कौतुक

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** विदर्भात आतापर्यंत अनेक मराठी चित्रपट तयार झाले आणि त्याचे धडाक्यात प्रदर्शनही झाले. पण विदर्भाच्या या मातीत तयार झालेल्या पहिला हिंदी चित्रपट 'बेरा-एक अघोरी' प्रदर्शित होणाच्या मार्गावर आहे. धीरल एंटरटेनमेंट निर्मित या चित्रपटाच्या चमूने नुकतीच केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली. त्यावेळी त्यांनी चित्रपटाच्या चमूचे कौतूक करीत त्यांना प्रोत्साहन दिले. या चित्रपटातील प्रमुख कलाकार प्रेम धीराल, शक्तीवीर धीराल, निर्माते राजू भारती आणि दिग्दर्शक मिलिंद कुलकर्णी यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. या चित्रपटाचे संपूर्ण चित्रिकरण नागपूर, चंद्रपूर व इतर ठिकाणी झाले असून यातील सर्व कलाकार विदर्भातील आहेत. नुकतीच या चित्रपटाची २ गाणी प्रदर्शित करण्यात आली आहेत.



# उत्तर भारतात थंडीचा जोर वाढणार

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** सध्या देशाच्या विविध भागात थंडीचा जोर वाढला आहे. उत्तर भारतातून कोरडे वारे वाहत असल्याने थंडी वाढली आहे. दरम्यान, उत्तर भारततही थंडी वाढण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. श्रीलंकेच्या किनारपट्टीजवळ नैऋत्य बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र तयार होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यामुळे देशातल काही भागात पावसाचा अंदाजही वर्तवण्यात आला आहे. दरम्यान, दिल्ली-एनसीआरमधील प्रदूषणाची स्थिती दुसऱ्या दिवशीही अशीच राहणार आहे. त्याचवेळी, कमाल तापमान 30 अंश सेल्सिअस आणि किमान तापमान 17 अंश सेल्सिअस राहण्याची शक्यता आहे. दिल्लीसह उत्तर प्रदेश तसेच अनेक राज्यात थंडीचा जोर वाढला आहे. अनेक राज्यांमध्ये गुलाबी थंडी सुरू झाली आहे. बर्फवृष्टीमुळे डोंगराळ भागात थंडी वाढली आहे. दरम्यान 9 आणि 10 नोव्हेंबरपर्यंत दिल्लीतील वेस्टर्न डिस्टर्बन्समुळे येत्या काही दिवसांत कमाल तापमानात हळूहळू घट होण्याची शक्यता आहे. हरियाणासह उत्तराखंडमध्ये पावसाची शक्यता हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार, दिल्लीसह हरियाणाच्या फरिदाबाद आणि गुरुग्राममध्ये आज (9 नोव्हेंबर) पाऊस पडण्याची शक्यता आहे. फरिदाबादमध्ये विजांच्या गडगडाटासह वादळी पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. गुरुग्राममध्येही आज मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. डोंगराळ राज्यांमध्ये बर्फवृष्टी सुरु राहण्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. उत्तराखंडमध्ये हलका पाऊस पडू शकतो. तसेच हिमाचल प्रदेशच्या काही भागात देखील पावसाची शक्यता आहे. उत्तराखंड आणि हिमाचल प्रदेशच्या काही भागात हलकी बर्फवृष्टी होण्याची शक्यता देखील वर्तवण्यात आली आहे.



**महाराष्ट्रातही गारठा वाढला**

राज्यातही थंडीचा जोर वाढला आहे. पहाटे थंडी तर दुपारी उन्हाचा चटका राज्यात पाहायला मिळत आहे. राज्यात पहाटे दव धुकेही पडत आहे. काही ठिकाणी ढगाळ वातावरण असले तरी दुपारी कडक उन्हाचा चटका बसत आहे. राज्यात किमान तापमान 12 ते 21 अंशाच्या आसपास आहे.

# प्रचारादरम्यान रुग्णवाहिकेसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी थांबवला ताफा

आधुनिक केसरी न्यूज



**नवी दिल्ली :** अवघ्या तीन दिवसांत हिमाचल प्रदेश विधानसभा निवडणुकीसाठी मतदान होणार आहे. त्यामुळे राज्यात प्रचार शिगेला पोहोचला आहे. एकीकडे भाजपानं सत्ता कायम राखण्यासाठी प्रतिष्ठा पणाला लावलेली असताना दुसरीकडे काँग्रेसनं भाजपाला दे धक्का देण्यासाठी जोरदार तयारी केली आहे. त्यामुळे हिमाचल प्रदेशमधलं राजकीय वाचावरण आता चांगलंच तापलं आहे. येत्या १२ नोव्हेंबर रोजी हिमाचल प्रदेशमध्ये मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी राज्यात ठिकठिकाणी प्रचारसभा घेत आहेत. यादरम्यानचा एक व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज हिमाचल प्रदेशमधील कांग्रा भागात प्रचार करत आहेत. यादरम्यान, चांबी परिसरातील एक व्हिडीओ सध्या व्हायरल होत असून त्यात पंतप्रधानांनी एका रुग्णवाहिकेसाठी आपला ताफा थांबवल्याचं दिसत आहे.
चांबी परिसरात झालेल्या प्रचारसभेनंतर सभास्थळावरून पंतप्रधान नरेंद्र मोदींचा ताफा हेलिपॅडच्या दिशेने निघाला. मात्र, तेवढ्यात एक रुग्णवाहिका या ताफ्याच्या मार्गात आली. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदींचा ताफा आधी थांबवण्यात आला आणि रुग्णवाहिकेला रस्ता मोकळा करून देण्यात आल्याचं व्हिडीओमध्ये दिसत आहे. वेगाने ही रुग्णवाहिका समोरच्या रस्त्यावरून निघून गेल्यानंतर मोदींचा ताफा आपल्या निश्चित स्थळाच्या दिशेने मार्गस्थ झाला. गेल्या आठवड्याभरात हिमाचल प्रदेशमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदींची ही दुसरी सभा होती. सुजानपूर आणि चांबी या भागांमध्ये मोदींनी आज प्रचार केला. गेल्या आठवड्यात ५ नोव्हेंबर रोजी मोदींनी सुंदरनगर आणि सोलन या भागातील प्रचारसभांमधून विरोधकांवर जोरदार टीका केल्याचं पाहायला मिळालं.

# सावळदबारा येथे कुस्तीमध्ये प्रवीण देशमुखने मारली बाजी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे नागोबा यात्रा व शालीवस्ताद बाबा यांच्या उरुसानिमित जंगी कुस्त्यांची स्पर्धा पंचकमेटीच्या वतीने आयोजित करण्यात आली होती. जंगी कुस्तीला स्पर्धा दि.८/११/२२ मंगळवार रोजी दुपारी २ ते सायंकाळी ६ सायंकाळी सहा वाजेपर्यंत कुस्ती स्पर्धा जोरदार सुरुवात करण्यात आली होती.गावकरी व पंचकमेटीच्या वतीने हा जंगी कुस्तीचा कार्यक्रम घेण्यात आला होता. बाहेरून आलेले मल्ल पहेलवान कुस्तीमधे आप आपली बाजी रसिकांना दाखवत होते. खाली पाठ कोणाची टेकते याकडे ग्रामस्थ व पंचकमेटी लक्ष ठेवून होते. जो मल्ल विजयी झाला त्याला तात्काळ पचंकमेंटी ईनाम देत होते. दोन वाजे पासून ह्या जंगी कुस्तीचा आखडा सहावाजे पर्यंत चालला होता. अखेर शेवटची कुस्ती लावण्यात आली हि कुस्ती चांगलीच रंगली होती.गेले तीन ते चार वर्षांपासून संदीप पहेलवान देवपूर हे सावळदबारा आखाड्यात बाजी मारत विजयी होत होते. परंतु यंदा ते पराभूत झाले आहे. यंदा शेवटीच्या या कुस्ती मधे प्रवीण देशमुख कुऱ्हाड याने बाजी मारुन संदीप पहेलवान (देवपूर) यानां पराभूत केले.प्रविण देशमुख पहेलवान बाजी मारुन कुस्ती स्पर्धामध्ये



विजयी झाले अशे घोषित करण्यात आले. याप्रसंगी पचकमेंटीने त्याचे स्वागत करून सत्कार करून त्यांना ईनाम देण्यात आला होता. यावेळी पचकमेंटीचे अध्यक्ष पंजाबराव देशमुख, सचिव माजी सरपंच लुखमान मो.शरीफ,संचालक डॉ. आर.बी.पांडेसाहेब,प्राचार्य पंजाबराव कोलते, माजी सभापती चुनीलाल चव्हाण, विठ्ठलराव देशमुख,उपध्याक्ष वसंता चोरमारे,व पंचकमेटीचे सदस्य शेख.जलील शेख आयुबखाँ,डॉ. जफर सय्यद,प्रा.जीवन कोलते(सामाजिक), डॉ. विठ्ठल कोते,सरपंच भाऊराव कोलते, मधुकर पुजारी, मनोहर जगताप, नरेश देशमुख,मा.सरपंच समाधान सुरडकर, मा.सरपंच किसन सुर्यवंशी, मा.सरपंच मेहतांब तडवी,मनोज शिवाजी बुढाळ,सरपंच विनोद टिकारे,मो. फिरोज मो.लुखमान, मो.रफीक मो.शब्बीर, फकीराभाऊ तडवी, ईशा तडवी,पंचक्रोशीतील नागरिक,कुस्ती प्रेमी व गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने कुस्ती स्पर्धा पाहण्यासाठी उपस्थित होते. या कुस्ती मध्ये बंदोबस्त फर्दापूर पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक देवीदास वाघमोडे, उपनिरीक्षक रणजित कासले, सावळदबाराचे बिट जमादार मिरखाँ तडवी,निलेश लोखंडे, पो.कॉ. शिवदास गोपाळ यांच्या कडू कडून चोख पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता अशी माहिती माजी सरपंच मो.लुखमान मो.शरीफ यांनी बोलताना सांगितले.